। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ०७ वा । शनिवार दिनांक ०७ मार्च, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### जवळा दु. येथे सोन्याचे दागिणे सह रोख रक्कमेच चोरी

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सुखदेव सोलार वाघमारे, वय ६५ वर्षे, रा. जवळे दु. ता. जि. धाराशिव यांचे राहते घराचे कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दि. २०.०२.२०२६ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम ५३,००० असा एकुण १,६८,५०० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सुखदेव वाघमारे यांनी दि.०५.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१(४), ३०५ (अ) (ब) गुन्हा नोंदवला आहे.

### बांगरवाडी येथे रोख रक्कम व सोन्याच्या दागिणेची चोरी

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी मनिषा नितीन बांगर, वय ३० वर्षे, रा. बांगरवाडी ता. कळंब जि. धाराशिव यांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम २०,००० असा एकुण ८०,९६६ किंमतीचा माल हा नितीन, गोपीनाथ, गंगाबाई, पिंट्या यांनी दि. ०१.०३.२०२६ रोजी फिर्यादी यांचे राहते घरातुन चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-मनिषा बांगर यांनी दि.०५.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### शेतातून अॅल्युमिनियम तारेची चोरी

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.०३.०३.२०२६ रोजी सुरतगाव शिवारातील नागनाथ रतु गुंड यांचे शेतात तार ओढण्यासाठी आणलेले ६ स्पॅन २५८० मीटर ईलेक्ट्रीक अॅल्युमिनीयम तार एकुण २,५०,००० किंमतीची अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- स्वप्निल संजयराव दहातोंडे, वय ४२ रा. पुणे जि. पुणे ह.मु. स्वरा इंजिनिरींग साईट माळुंब्रा ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०५.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### शासकीय कामात अडथळा करणाऱ्यावर गुन्हा दाखल

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत वैजीनाथ रा. तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०५.०३.२०२६ रोजी जुने बसस्थानक पाठीमागील पाण्याचे टाकीजवळ तुळजापूर येथे फिर्यादी नामे-दत्तात्रय रामभाउ साळुंखे, वय ५८ वर्षे, व्यवसाय स्वच्छता निरीक्षक नगरपरिषद तुळजापूर रा. विश्वासनगर तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव हे व कर्मचारी हे अतिक्रमण काढण्याचे काम करत वैजनाथ यांने तुम्ही कोणाचे आदेशाने अतिक्रमण काढता असे म्हणून शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, मारहाण करुन बघुन घेतो अशी धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-दत्तात्रय साळुंखे यांनी दि.०५.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे तुळजापूर येथे अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' : जिल्ह्यात व्यापक नियोजन; महसूल सेवा तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार

धाराशिव (जिमाका)- महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख,कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील नागरिक,शेतकरी,विद्यार्थी व महिलांच्या दैनंदिन प्रश्नांचे तातडीने निराकरण करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान (टप्पा १) राबविण्याचा निर्णय घेतला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने राबविण्यात येणाऱ्या या अभियानांतर्गत जिल्ह्यात सर्व तालुक्यांमध्ये शासनाच्या सूचनांनुसार तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले असून शिबिरांचे वेळापत्रकही जाहीर करण्यात आले आहे.

पूर्वतयारीसंदर्भातील महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहे.हे अभियान यशस्वी होण्यासाठी भोगवटादार वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतरित करून अद्ययावत ७/१२ लाभार्थ्यांना देणे, 'जिवंत ७/१२' मोहीम राबवून प्रलंबित नोंदींची दुरुस्ती पूर्ण करणे,सामाजिक अर्थसहाय्य योजनांतील पात्र लाभार्थ्यांचे अर्ज भरून मंजुरी आदेशांचे वाटप करणे आदी कामे शिबिरापूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तुकडेबंदी कायद्यांतर्गत १५ नोव्हेंबर १९६५ ते १५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत प्रमाण क्षेत्राचे उल्लंघन झालेल्या व्यवहारांची गावनिहाय यादी तयार करून फेरफार घ्यावेत,शाळांचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांचे दाखले कॅम्प मोडमध्ये तयार करून शिबिरात वितरित करण्यात येणार आहे.पाणंद रस्त्यांच्या प्रशासकीय मान्यतेचे आदेश ग्रामपंचायतींना द्यावेत तसेच 'सर्वांसाठी घरे' योजनेंतर्गत प्रलंबित पट्टे वाटपाची प्रक्रिया पूर्ण करावी,असे स्पष्ट करण्यात आले आहे.शिबिरादरम्यान उपलब्ध मुख्य सेवा शिबिरात प्रलंबित व विवादग्रस्त फेरफार निकाली काढणे,अभिलेख दुरुस्ती व हेल्प डेस्कमार्फत ७/१२ वरील चुका दुरुस्त करणे,लोकसेवा हक्क कायद्यानुसार विविध प्रमाणपत्रांचे अर्ज स्वीकारणे व वितरित करणे,कमी-जास्त पत्रके तयार करून गाव नमुने अद्ययावत करणे या सेवा देण्यात येणार आहेत.

तसेच "Ease of Doing Business' सुधारणा अंतर्गत एक खिडकी सुविधा, ई-मोजणी,अॅग्रीस्टॅक नोंदणी,पीएम किसान,तक्रार निवारण कक्ष (जनता दरबार),समाधान अॅप,आपले सरकार पोर्टल व पी.जी.पोर्टलवरील तक्रारींचे निवारण करण्यात येणार आहे.

महसूल कायद्यातील नवीन सुधारणांची जनजागृती करण्यात येणार आहे.कलम ४२ अन्वये अकृषिक (छ-) रूपांतरणासाठी स्वतंत्र परवानगीची आवश्यकता नसून विकास आराखड्याची मंजुरी हीच परवानगी मानली जाईल, याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

सनद प्रणालीतील बदल,एकवेळचे अधिमूल्य भरण्याची सुधारित व्यवस्था तसेच १० डिसेंबर २०२५ च्या अधिसूचनेनुसार महाभूमी पोर्टलवरील क्यूआर कोडयुक्त डिजिटल ७/१२ ची कायदेशीर वैधता याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.विविध योजनांचा लाभ देण्यात येणार असून शिबिरांमध्ये नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प २.० (पोकरा) अंतर्गत विकास कामांची माहिती,एसबीआय व पोस्ट खातेदारांसाठी जीवन विमा योजना,आयुष्यमान कार्ड वितरण,रेशनकार्ड दुरुस्ती व नवीन रेशनकार्ड,कृषी सेवा,बँक व पोस्ट सेवा आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या अभियानात लोकप्रतिनिधी व प्रशासनाची भूमिका महत्वाची राहणार आहे.अभियानासाठी खासदार,आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष- उपाध्यक्ष,पंचायत समिती पदाधिकारी,नगराध्यक्ष,सरपंच आदी लोकप्रतिनिधींना प्रत्यक्ष भेटून आमंत्रित करण्यात येणार असून महिला बचत गट व स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घेण्यात येणार आहे.

सर्व तहसीलदार यांनी आपल्या स्थानिक पातळीवर प्रत्येक शिबिराची प्रसिद्धी, व्हिडिओ क्लिप्स,अभिप्राय नोंदवही व माध्यमांद्वारे व्यापक प्रचार करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

जिल्हास्तरीय संपर्क अधिकाऱ्यांची नियुक्ती शासन निर्णयानुसार जिल्हास्तरावर तालुकानिहाय संपर्क अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी सर्वश्री श्री.संतोष राऊत (वाशी),श्री.प्रविण धरमकर (तुळजापूर), श्रीमती.अरुणा गायकवाड (लोहारा), श्री.श्रीकांत पाटील (परंडा),उपविभागीय अधिकारी धाराशिव,भूम,कळंब व उमरगा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अभियानाची अंमलबजावणी शासन निर्णयातील प्रपत्र अ-१ ते अ-८ नुसार वेळेत अहवाल सादर करून करावी,अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. अभियान प्रभावी,पारदर्शक व लोकाभिमुख पद्धतीने राबविण्याची जबाबदारी सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी सर्व विभागांना गांभीर्याने व समन्वयाने कार्यवाही करून हे अभियान यशस्वी करावे,असे निर्देश दिले आहेत.

## धाराशिव येथे ५०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयाचे काम तातडीने पूर्ण करा – पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश



धाराशिव (जिमाका) मुंबई, - धाराशिव येथे रुग्णांना दर्जेदार व आधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणाऱ्या ५०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयाचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. मंत्रालयात पार पडलेल्या संयुक्त आढावा बैठकीत त्यांनी या लोकहितकारी प्रकल्पाचे काम निर्धारित वेळेत व उच्च गुणवत्तेने पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, या रुग्णालयाचे काम रुग्णसेवेचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण केले जावे. तसेच पुढील काही दिवसांत हे रुग्णालय सर्वसामान्य जनतेसाठी खुले करण्याचे नियोजन करावे.

धाराशिव जिल्ह्यातील नागरिकांना आधुनिक व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी या उद्देशाने सुमारे ३६० कोटी रुपये खर्चून ५०० खाटांचे अत्याधुनिक जिल्हा रुग्णालय उभारण्यास शासनाने मान्यता दिली आहे. मंत्री सरनाईक आणि मंत्री आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या प्रकल्पाच्या आढावा बैठकीत रुग्णालयाच्या बांधकामासाठी आवश्यक निधी, तांत्रिक अडचणी आणि कामाच्या प्रगतीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

प्रस्तावित रुग्णालयाची मुख्य इमारत तीन मजली असून तिचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ४५ हजार चौ.मी. आहे. या प्रकल्पात कॅन्टीन, धर्मशाळा, लॉन्ड्री, मॉर्च्युरी, फार्मसी इमारत, पार्किंग व्यवस्था, गॅस मॅनिफोल्ड रूम व ऑक्सिजन प्लांट, तसेच बायोमेडिकल वेस्ट व्यवस्थापनासाठी स्वतंत्र सुविधा उभारण्यात येणार आहेत. याशिवाय वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानांचीही व्यवस्था करण्यात येणार आहे. काम अधिक सुनियोजित आणि जलद गतीने पूर्ण व्हावे यासाठी रुग्णालय इमारत व निवासस्थानांसाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही मंत्र्यांनी दिले.

रुग्णालय परिसरात अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा व मलनिस्सारण व्यवस्था, अग्निशमन यंत्रणा, सौर ऊर्जा प्रणाली, पावसाचे पाणी साठवण (रेन वॉटर हार्वेस्टिंग), पार्किंग आणि हरित परिसर विकासाची कामे करताना ती गुणवत्तापूर्ण पद्धतीने व पुढील दोन दशकांच्या गरजा लक्षात घेऊन करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

धाराशिव जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांसाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याने काम करताना गुणवत्तेला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे मंत्री सरनाईक यांनी नमूद केले. या रुग्णालयाच्या माध्यमातून गरजू नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट साध्य व्हावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

## मार्च ते मे दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर जिल्ह्यात मंडळ व नगरस्तरावर व्यापक शिबिरे

धाराशिव दि.५ मार्च (जिमाका)माहे मार्च ते मे २०२६ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने राबविण्यात येणाऱ्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' अभियान टप्पा क्र.१ ची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.या अभियानांतर्गत मार्च ते मे महिन्यात मंडळस्तरावर तसेच नगरपरिषद व नगरपंचायतस्तरावर शिबिरे आयोजित केली जाणार आहेत.ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक,शेतकरी,महिला व विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यासाठी विशेष जनजागृती व प्रसार अभियान व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे.

या शिबिरांमध्ये प्रलंबित फेरफार निकाली काढणे,अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क, लोकसेवा हक्क कायद्याविषयी मार्गदर्शन, अकृषक तरतुदी संदर्भात माहिती,डिजिटल ७/१२,कमी-जास्त पत्रक तयार करून गाव दप्तर अद्ययावत करणे,संजय गांधी योजना,आरोग्य शिबीर,आपले सरकार सेवा केंद्रातील विविध दाखले व प्रमाणपत्रे (रहिवासी,उत्पन्न,जात,नॉन क्रिमीलेअर,वय व अधिवास प्रमाणपत्र इ.)उपलब्ध करून देणे आदी सेवा दिल्या जाणार आहेत.

तसेच नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प २.० (पोकरा) अंतर्गत एकात्मिक विकास कामांची माहिती,डइख व पोस्ट खातेदारांसाठी जीवन विमा योजना १०० टक्के भरणा,आयुष्यमान कार्ड,कृषी सेवा, सलोखा योजना,अॅग्रीस्टॅक नोंदणी,आधार दुरुस्ती,मतदान नोंदणी,रेशनकार्ड दुरुस्ती व नवीन रेशनकार्ड,पीएम किसान, शाळानिहाय विद्यार्थी दाखले वाटप,पाणंद रस्ते,सर्वांसाठी घरे पट्टेवाटप,किसान क्रेडिट कार्ड,पीक कर्ज नूतनीकरण आदी विविध सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

या सेवा तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.त्यासाठी जिल्ह्यातील सर्व महसूल मंडळ व नगरपरिषद/नगरपंचायतस्तरावर खालीलप्रमाणे शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.

०७ मार्च २०२६ रोजी धाराशिव -केशेगाव,तुळजापूर-सलगरा (दि.), उमरगा-बलसूर,लोहारा-घानुरी,भूम -माणकेश्वर,परंडा-आसू,कळंब- येरमाळा,वाशी-पारगाव येथे शिबिरे होतील.११ मार्च रोजी धाराशिव- बेंबळी; १४ मार्च रोजी धाराशिव- तेर,तुळजापूर- इटकळ, उमरगा- डाळींब,लोहारा-माकणी; १७ मार्च रोजी भूम-पाथरुड,परंडा- जवळा नि., कळंब-मस्सा ख.,वाशी -तेरखेडा, तसेच धाराशिव - करजखेडा व उमरगा- नारंगवाडी येथे शिबिरे पार पडतील.१८ मार्च रोजी धाराशिव - ढोकी; २४ मार्च रोजी तुळजापूर - जळकोट व धाराशिव -येडशी; २७ मार्च रोजी कळंब- शिराढोण; २८ मार्च रोजी परंडा- आनाळा येथे शिबिरे होतील.तसेच ०८ एप्रिल रोजी धाराशिव- आंबेजवळगा; १० एप्रिल रोजी धाराशिव-जागजी,तुळजापूर- तामलवाडी, उमरगा- बेडगा,लोहारा- जेवळी,भूम- वालवड,परंडा- शेलगाव कळंब- नायगाव, वाशी-पारा;१७ एप्रिल रोजी धाराशिव- पाडोळी (आ), तुळजापूर- आरळी बु.,उमरगा - मुळज,भूम-आंबी,परंडा- सोनारी,कळंब -मोहा; २४ एप्रिल रोजी तुळजापूर- मंगरूळ,भूम-ईट,कळंब- गोविंदपूर; ३० एप्रिल रोजी कळंब-ईटकूर; ६ मे रोजी तुळजापूर- सावरगाव; १५ मे रोजी धाराशिव शहर येथे शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.

नगरपरिषद/नगरपंचायत स्तरावर ८ मे २०२६ रोजी धाराशिव ग्रामीण,तुळजापूर, उमरगा,लोहारा,भूम,परंडा,कळंब,वाशी येथे तर १५ मे २०२६ रोजी नळदुर्ग व मुरूम येथे शिबिरे होणार आहेत.

जिल्ह्यातील सर्व खासदार,आमदार,जिल्हा परिषद अध्यक्ष - उपाध्यक्ष,जिल्हा परिषद सदस्य,पंचायत समिती सभापती व सदस्य, नगराध्यक्ष,नगरपरिषद सदस्य, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनी संबंधित मंडळनिहाय शिबिरांना उपस्थित राहून सहभाग नोंदवावा,तसेच आपल्या कार्यक्षेत्रातील शेतकरी,शेतमजूर,विद्यार्थी व लाभार्थ्यांना माहिती देऊन लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करावे,असे आवाहन करण्यात आले आहे.लाभ वाटपावेळी लोकप्रतिनिधींनी उपस्थित राहावे,अशीही विनंती करण्यात आली आहे.जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी नमूद तपशीलानुसार आयोजित शिबिरांमध्ये उपस्थित राहून आपले अर्ज सादर करावेत,असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## मुरूम शहर पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी डॉ.रामलिंग पुराणे



मुरूम, ता. ५ (प्रतिनिधी) : येथील मुरूम शहर पत्रकार संघाची गुरुवार (ता. ५) रोजी बसव भवन येथील महात्मा बसवेश्वर वाचनालयाच्या सभागृहात बैठक पार पडली. यावेळी वर्षभरात समाज उपयोगी उपक्रम घेण्याचे ठरले. या बैठकीत मुरूम शहर पत्रकार संघाची एकमताने कार्यकारिणीची निवड प्रक्रिया पार पडली. सन २०२५ च्या कार्यकारणीला सन २०२६ साठी सर्वानुमते पुन्हा फेर निवड करण्यात आली. मुरूम शहर पत्रकार संघटना अध्यक्षपदी डॉ. रामलिंग पुराणे, उपाध्यक्ष नहिरपाशा मासुलदार, सचिव मोहन जाधव, सहसचिव अजिंक्य मुरूमकर, सल्लागार तथा मार्गदर्शक प्रा. डॉ. महेश मोटे, रफिक पटेल, राजेंद्र कारभारी तर प्रसिद्धीप्रमुख प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले यांची निवड करण्यात आली. यावेळी प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले, राजेंद्र घोडके, बालाजी व्हनाजे, जगदीश सुरवसे, हुसेन नुरसे, इम्रान सय्यद, विशाल देशमुख, नामदेव भोसले, छायाचित्रकार संकेत इंगोले, अमित ढाले आदीसह पत्रकार बांधव उपस्थित होते.

## मुरूम शहर पत्रकार संघाकडून महावितरण कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार



मुरूम (रामलिंग पुराण)- लाईनमन दिनाचे औचित्य साधून गुरुवारी (ता. ५) रोजी मुरूम शहर पत्रकार संघाकडून महावितरण कर्मचाऱ्यांचा फेटा बांधून शाल, पुष्पहार व टेस्टर भेट देऊन विशेष सत्कार करण्यात आला. ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता आपला जीव धोक्यात घालून वीज सुरळीतपणे चालू राहावे, यासाठी नागरी सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा लाईनमन दिनी सत्कार व्हावा व त्यांच्या पाठीशी नागरिक खंबीरपणे उभे असून त्यांना पाठबळ देण्यासाठी मुरूम शहर पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आल्याचे मत यावेळी संघाचे अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी सहायक अभियंतासह सर्व महावितरण कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नहिरपाशा मासूलदार, सचिव मोहन जाधव, सहसचिव अजिंक्य मुरूमकर, प्रसिद्धीप्रमुख प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले आदींची उपस्थिती होती.

## प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, जलील वय ४१ रा. इंद्रठाणा ता. रेणापुर लातुर यांनी दि. ०५.०३.२०२६ रोजी डिकसळ चौक कळंब येथे पिकअप क्र एमएच २० जीसी ११७० मध्ये गोवंशीय जातीचे ७ जनावरे वाहनासह एकुण ४,४५,००० किंमतीचे गोवंशीय जातीचे जनावरे त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना कळंब पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१), ११(१)(अ), ११(१)(एच), ११(१)(एफ),११(१)(आय) सह ५(अ),५(बी), ९(ब), ११ पशु संरक्षण अधिनियम अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तापास करीत आहेत.

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## परावलंबी राहाणे अयोग्य

भारत काही बाबीबाबत परावलंबी आहे. काही वस्तू हा पदेशातून मागवाव्या लागतात. दुसरा पर्यायही नसतो. इंधनाच्या बाबतीत असेच आहे. इराण-इराक तसेच कांही हे इंधनाबाबत स्वयंपुर्ण आहेत. त्यांच्याकडे खणीजसंपत्ती आहे. तेल असले तरी पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. पेट्रोल पन्नास रुपये असेल तर पाण्याची बाटली ही शंभररूपये लिटर आहे. त्यामुळे केवळ इंधनाबाबत स्वयंपुर्ण असणारे देश हा बऱ्याच बाबी परदेशातून मागवाव्या लागतात. आज जगात अमेरिका हा महासत्ताधिश आहे. त्यामुळे जगावर आपले नियंत्रण राहावे हा त्यांचा हेतू आहे. त्यामुळे तो ईतर देशावर दबाब निर्माण करण्याचा सतत प्रयत्न करीत असतो. भारताला देखील त्याने दबाब टाकण्याचा प्रयत्न केला मात्र भारतचे पंतप्रधान नरेंद्र मोदी खंबीर भुमिका घेतल्याने फारसा उपयोग झाला नाही. त्यातच भारताचे सावध भुमिका घेतली. टेरिफ बाबत मनावर न घेता स्वयंपुर्णता स्विकारली. अमेरिकेचा रशियाकडून इंधन घेण्याचा सतत विरोध आहे. या बाबत जाहिर असे वक्तव्य केले होते. इस्त्रायल-इराण युद्धामुळे काही प्रमाणात भारताला झळ बसणार आहे. भारताची खणखर भुमिका घेतल्याने अमेरिकेला विचार करायालाा भाग पाडले आहे. त्याच प्रमाणे भारतात पेट्रोल-डिझेलच्या किंमती वाढण्याचे संकट सध्या टळले आहे, कारण भारताला रशियाकडून कच्चे तेल खरेदी करण्याची सूट मिळाली आहे. अमेरिकेच्या ट्रेझरी विभागाने भारतीय रिफायनरीजना ३० दिवसांचा विशेष परवाना दिला आहे. हा परवाना ३ एप्रिलपर्यंत वैध राहील. अमेरिकेचे ट्रेझरी सचिव स्कॉट बेसेंट यांनी ६ मार्च रोजी सांगितले की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या ऊर्जा अजेंड्याअंतर्गत हे तात्पुरते पाऊल उचलण्यात आले आहे. ते म्हणाले की, भारत अमेरिकेचा एक महत्त्वाचा भागीदार आहे आणि जागतिक बाजारात तेलाचा पुरवठा स्थिर ठेवण्यासाठी ही सूट देण्यात आली आहे. असे जरी म्हटले असले तरी हा तात्पुरता परवाना आहे. भारत आज पर्यंत रशियाकडूनच इंधन खरेदी करीत होता. अमेरिकेच्या धमकीला झुकारून भारत रशियाकडून इंधन खरेदी करीत होता. भारत आणि रशियाचे अनेक वर्षाचे मैत्रीचे संबंध आहेत. मैत्रीमुळे अनेक व्यवहार रशियासोबत भारताने केले व करीत आहे. जगात अमेरिका व रशिया या दोन राष्ट्राला बलाढ्या समजले जाते. दोघामध्ये वैर आहे हे जगाला माहिती आहे तरी रशिया वरचढ आहे. वास्तविक आपआपल्यापरिने सर्वच देश हे सक्षम आहे. चीन असो किंवा भारत हे देश सतत प्रगती साधत आहे. मसाले पदार्थ, फळा बाबत भारत सक्षम आहे. या पदार्थाची निर्यात मोठ्या प्रमाणात करीत आला आहे. इंधनाबाबत ठराविक देश सक्षम आहे. हा नैसर्गिक साठा असल्याने त्याच्या जोरावर इंधन उत्पादक जगाला आपल्या मुठीत ठेवण्याचा विचार करीत असतात. इंधन आहे याचा अर्थ सर्व बाबतीत सक्षम समजणे चुकीचे आहे. भारतात मोठ्या प्रमाणात इंधन लागते. सध्याला इंधनाचा साठा आहे त्यात वाढ झाली नाही. आयत मंदावली आहे. त्यामुळे इराण आणि इस्त्रायल अमेरिकेतील युद्धाच्या झळा आता भारतापर्यंत पोहोचू लागल्यात. इराण आणि इस्त्रायल-अमेरिकेतील युद्धामुळे गॅस पुरवठ्यावर परिणाम होऊ लागल्याने व्यवसायिक वापराच्या गॅस सिलेंडरचा पुरवठा गुरूवारपासून थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. घरगुती वापराचा गॅस पुरवठा लोकांना व्यवस्थित होत राहावा यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. पुण्यातील बीपीसीएलच्या शिक्रापूर इथल्या प्लांटमध्ये आणि चाकण मधील एचपीसीएलच्या प्लांटमध्ये व्यावसायिक वापराचे सिलेंडर देणे बंद करण्यात आले आहे. व्यावसायीक सिलेंडरची मागणी अधिक आहे तो व्यवसायिक वापराचा सिलेंडर हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्समधे वापरला जातो. इंडस्ट्रीयल युजसाठी देखील त्याचा उपयोग केला जातो. धातु वितळवणे, पावडर कोटींग करणे अशा वेगवेगळ्या कामांसाठी हा गॅस वापरला जातो. त्याचबरोबर पाच आणि सात किलोच्या प्रमाणात देखील तो लोकांच्या सोयीसाठी उपलब्ध आहे. व्यवसायिक वापराच्या सिलेंडरला सरकारकडून अनुदान दिले जात नाही त्यामुळे घरगुती सिलिंडरपेक्षा त्याची किंमत जास्त असते. कमर्शियल सिलेंडरच्या नव्या ऑर्डर घेऊ नका. एचपीसीएल आणि बीपीसीएलच्या डीलर्सला अशा सूचना देण्यात आले आहेत. युद्धाचा परिणाम काही प्रमाणात होणारच आहे. युद्धामुळे नुकसान होत असते. त्यामुळे आलिकडील काळात युद्ध नको तर शांतत हवी असा संदेश दिला जात आहे. भारत हा इंधनाबाबत परावलंबी आहे. त्यामुळे भारतीयांनी एक बाब सतत लक्षात ठेवावी इंधनाचा वापर कमी कसा करता येईल याचा विचार करावा. भारतीयांनी युद्धाची झळ पाहात तर इंधनात काटकसर केली तर निश्चित हे संकट दूर करू शकतात. मुळात भारत देश लोकसंख्येच्या मानाने मोठा आहे. जवळपास प्रत्येकाकडे दोन किंवा चार चाकी गाड्या आहेत. याचा उपयोग जर कामानिमित्त करावा. कामाशिवाय गाड्या वापरू नयेत. त्याच प्रमाणे अनावश्यक प्रवास टाळावा. जवळ जायाचे झाले तर पायी चलत जावे. प्रत्येक बाबीत जर इंधनाबाबत काटकसर सर्वांनी केली तर इंधनाची कमतरता भासणार नाही. युद्ध लवकर समाप्त व्हावे असे वाटते. यदाकदाचित समाप्त होईल. मुळात आपल्या देशात कोणत्याही बाबतीत काटकसर केली जात नाही. मनसोक्त वापर होतो. आता इंधनाबाबत असे करता येत नाही. इंधनाचा वापर काटकसरीने करावा लागेल. बचत करावीच लागेल. ते शक्य आहे. सध्याला व्यावसासिक गॅस सिलेंडरबाबत कटोती घेतली आहे. त्यामुळे यापुढे भारतीयांनी इंधनाला पर्याय शोधावा. भारतीयांनी आता इलेक्ट्रीक गाड्याची निर्माती केली आहे. त्याच्या किंमती ह्या खिशाला परवडणाऱ्या नाहीत. त्या स्वस्तात मिळाल्या पाहिजेत. तरच ईलेक्ट्रिक गाड्या सहज खरेदी करतील. त्याच प्रमाणे सौर ऊर्जेचा वापर कसा करता येईल यावर भर दिला पाहिजे. आता नागरिकांनी इंधनाबाबत पर्याय शोधावा. इंधनाची काटकसर ही मोठी बचत आहे. युद्धामुळे इंधनाचा भडका उडाला आहे हे मान्य करून चालावे. अमेरिकेने रशियाकडून ठराविक काळापर्यंत इंधनखरेदीची परवानगी दिली असली तरी निर्बंध घालून दिली आहे हे सतत लक्षात घेतले पाहिजे. परावलबीपना हा घातक आहे हेही लक्षात ठेवावे.

## जागतिक महिला दिन : सन्मानाचा उत्सव की संघर्षाची जाणीव?

जगभरात ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. पण हा केवळ शुभेच्छांचा, गुलाबांच्या फुलांचा आणि सोशल मीडियावरच्या पोस्टांचा दिवस आहे का? की हा दिवस आहे आत्मपरीक्षणाचा. समाज म्हणून आपण स्त्रीच्या सन्मान, सुरक्षितता आणि समानतेसाठी नेमकं काय केलं याचा हिशेब मांडण्याचा? जागतिक महिला दिनाची संकल्पना ही फक्त उत्सवासाठी जन्माला आलेली नाही. १९०८ साली न्यूयॉर्क येथे कामगार महिलांनी समान वेतन, सुरक्षित कामाची परिस्थिती आणि मतदानाचा अधिकार यासाठी आंदोलन छेडले. त्या आंदोलनातून उगम पावलेला हा दिवस पुढे युनायटेड नॅशन्सने १९७५ मध्ये याला अधिकृत मान्यता दिली आणि जगभर स्त्री-अधिकारांच्या लढ्याचे प्रतीक म्हणून तो साजरा होऊ लागला. म्हणजेच, हा दिवस आहे संघर्षाचा, स्वाभिमानाचा आणि परिवर्तनाचा.

भारतात स्त्री शिक्षणाची टक्केवारी वाढली आहे, अनेक महिला प्रशासन, उद्योग, विज्ञान, क्रीडा, राजकारण अशा सर्व क्षेत्रांत झेंडा रोवत आहेत. द्रौपदी मुर्मू राष्ट्रपतीपदी विराजमान आहेत; वित्त, संरक्षण, अवकाश संशोधन अशा महत्त्वाच्या क्षेत्रांत महिलांनी नेतृत्व सिद्ध केले आहे. पण दुसरीकडे, घरगुती हिंसाचार, लैंगिक अत्याचार, कार्यस्थळी छळ, बालविवाह, स्त्रीभ्रूणहत्या या सारख्या समस्या अजूनही विदारक वास्तव म्हणून समोर आहेत. शिक्षण घेतलेल्या, आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या महिलेलाही सुरक्षिततेची हमी नाही, ही वस्तुस्थिती मन हेलावून टाकणारी आहे. महिलांच्या सन्मानासाठी कायदे झाले, २०१३ चा 'कार्यस्थळी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा', बालविवाह प्रतिबंध, घरेलू हिंसाचार प्रतिबंध पण कायदे कागदावर असले तरी त्यांची अंमलबजावणी कितपत प्रभावी आहे? समाजाची मानसिकता बदलल्याशिवाय स्त्री सन्मानाचे स्वप्न पूर्ण होणार नाही. ''स्त्री-पुरुष समान आहेत'' ही घोषणा आपण सहज करतो पण घरातील कामांची विभागणी पाहिली, तर अजूनही स्वयंपाकघराची जबाबदारी स्त्रीचीच मानली जाते. नोकरी करणारी स्त्री असो वा गृहिणी तिचा दिवस पहाटेपासून रात्रीपर्यंत कष्टांनी भरलेला असतो. तिच्या श्रमाला 'कर्तव्य' म्हणत आपण त्याची किंमत मोजतच नाही. ग्रामीण भागात तर अजूनही अनेक मुली शिक्षणाऐवजी घरकाम किंवा लवकर लग्नाच्या चक्रात अडकतात. शहरात करिअर करणाऱ्या महिलेला 'घर सांभाळशील का?' हा प्रश्न विचारला जातो; पण पुरुषाला 'घर सांभाळशील का?' असा प्रश्न विचारला जात नाही. हीच मानसिक दरी आहे.



स्त्री म्हणजे केवळ नात्यांची ओळख नाही तर आई, बहीण, पत्नी, मुलगी या नात्यांतूनच स्त्रीची ओळख ठरवण्याची सवय आपण लावून घेतली आहे. पण ती केवळ कोणाची तरी 'आई' किंवा 'पत्नी' नाही; ती स्वत:च्या स्वप्नांची, ध्येयांची, क्षमतेची स्वतंत्र व्यक्ती आहे. सावित्रीबाई फुले यांनी १८४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरू करताना समाजाच्या प्रचंड विरोधाला सामोरे जावे लागले. त्यांच्यावर दगड-चिखल फेकला गेला, अपमान झाला; पण त्यांनी हार मानली नाही. आज शिक्षणाच्या क्षेत्रात मुलींची वाढती संख्या ही त्याच संघर्षाची फलश्रुती आहे. स्त्रीशक्तीचे प्रतीक म्हणून आपण देवींची पूजा करतो, पण घरातील स्त्रीला निर्णयप्रक्रियेत समान स्थान देतो का? पूजा आणि प्रत्यक्ष वागणूक यातला विरोधाभास आजही जिवंत आहे.

स्त्री रात्री उशिरा सुरक्षितपणे रस्त्यावर चालू शकेल का? हा प्रश्न आजही उत्तराच्या प्रतीक्षेत आहे. मुलींना लहानपणापासून ''सावध रहा, असे करू नकोस, तिथे जाऊ नकोस'' असे शिकवले जाते; पण मुलांना ''आदर कर, जबाबदारीने वाग'' हे कितपत शिकवले जाते? महिला सुरक्षेचे प्रश्न केवळ पोलिस-प्रशासनापुरते मर्यादित नाहीत; ते सामाजिक संस्कारांशी जोडलेले आहेत. घरापासून शाळेपर्यंत आणि माध्यमांपासून मनोरंजनापर्यंत स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हा शक्तिशाली मंच आहे. महिलांना स्वत:चा आवाज मांडण्याची संधी मिळाली आहे; पण त्याचबरोबर ऑनलाइन ट्रोलिंग, सायबर छळ, अपमानास्पद टिप्पणी यांचाही सामना करावा लागतो. एका बाजूला महिला पायलट, शास्त्रज्ञ, खेळाडू म्हणून देशाचा अभिमान वाढवत आहेत; तर दुसऱ्या बाजूला त्यांच्या कपड्यांवर, व्यक्तिमत्त्वावर टीका केली जाते. स्त्रीची कर्तृत्वापेक्षा तिच्या बाह्य रूपावर अधिक चर्चा होते, ही मानसिकता बदलण्याची गरज आहे.

महिला दिनी भाषणे, सन्मान सोहळे, पुरस्कार हे सर्व महत्त्वाचे आहेत पण तेवढ्याने परिवर्तन घडणार नाही. बदलाची सुरुवात घरापासून व्हायला हवी. मुलगा आणि मुलगी यांना समान संधी, समान संस्कार, समान अपेक्षा दिल्या पाहिजेत. शाळांमध्ये लिंग-संवेदनशील शिक्षण आवश्यक आहे. माध्यमांनी जबाबदारीने स्त्रीप्रतिमा मांडली पाहिजे. राजकारणात महिलांचे प्रतिनिधित्व वाढले पाहिजे. निर्णयप्रक्रियेत त्यांचा आवाज अधिक प्रभावी झाला पाहिजे. स्त्री रोज लढते कधी घरात, कधी कामावर, कधी समाजात आणि कधी स्वत:च्या मनात. तिच्या डोळ्यात स्वप्ने असतात पण त्यांना पूर्ण करण्यासाठी तिला अनेक अडथळ्यांवर मात करावी लागते. जागतिक महिला दिन हा तिच्या संघर्षाला सलाम करण्याचा दिवस आहे. तिच्या जिद्दीचा, कर्तृत्वाचा आणि सहनशक्तीचा सन्मान करण्याचा दिवस आहे पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे हा दिवस आहे तिच्या वेदना समजून घेण्याचा, तिच्या आवाजाला ऐकण्याचा आणि तिच्या सोबत उभे राहण्याचा.

८ मार्च हा फक्त कॅलेंडरवरील एक दिवस नाही; तो समाजाच्या प्रगतीचा आरसा आहे. आपण खरोखरच स्त्रीला समानतेचे स्थान दिले आहे का? की अजूनही ती अनेक बंधनांत अडकलेली आहे? महिला दिनाच्या शुभेच्छा देताना आपण एक वचन देऊ या स्त्रीला केवळ सन्मानाचे शब्द नव्हे, तर समानतेची संधी देऊ, तिच्या स्वप्नांना आकाश देऊ आणि तिच्या सुरक्षिततेची हमी देऊ. स्त्री सशक्त झाली, तर समाज सशक्त होईल. कारण स्त्री ही केवळ कुटुंबाचा आधार नाही तर ती राष्ट्रनिर्मितीची शक्ती आहे. जागतिक महिला दिनानिमित्त प्रत्येक स्त्रीला मनापासून सलाम तिच्या अस्तित्वाला, तिच्या संघर्षाला आणि तिच्या उज्ज्वल भविष्यासाठीच्या आशेला. हा दिवस उत्सवाचा असो पण त्याहून अधिक परिवर्तनाचा असो. स्त्री ही शक्ती आहे, संवेदना आहे, संघर्ष आहे आणि सृजन आहे. तिच्याशिवाय समाज अपूर्ण आहे; तिच्या सन्मानाशिवाय प्रगती अपूर्ण आहे.

महिला सक्षमीकरणाबाबत बोलताना आर्थिक स्वातंत्र्य हा महत्त्वाचा मुद्दा आहे. स्वत: कमावणारी स्त्री निर्णय घेण्यास अधिक सक्षम होते. स्वयं-सहाय्यता गट, स्टार्टअप्स, लघुउद्योग यांमुळे अनेक महिलांनी आर्थिक स्वावलंबन मिळवले आहे. परंतु वेतनातील असमानता अजूनही दिसते. समान कामासाठी समान वेतन ही संकल्पना अजून पूर्णत्वाला गेलेली नाही. ग्रामीण शेतमजुरीपासून ते कॉर्पोरेट कार्यालयांपर्यंत महिलांना अनेकदा कमी मोबदला दिला जातो. आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे केवळ पैसा नव्हे; तो आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि सन्मान यांचा पाया आहे. तुमच्या कर्तृत्वाला नवं आकाश लाभो, स्वप्नांना नवी दिशा मिळो आणि आयुष्याच्या प्रत्येक वाटेवर सन्मान, सुरक्षितता आणि समानतेची साथ लाभो, हीच सदिच्छा. तसेच जागतिक महिला दिनानिमित्त सर्व महिलांना मन:पूर्वक शुभेच्छा!

**प्रविण बागडे**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान – टप्पा १

महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख,गतिमान व पारदर्शक करण्याची प्रभावी मोहीम महसूल विभागाच्या सेवा तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात,ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनता,शेतकरी,विद्यार्थी व महिलांचे दैनंदिन महसूलविषयक प्रश्र्न सत्वर निकाली निघावेत आणि प्रशासन अधिक कार्यक्षम व लोकाभिमुख व्हावे,या उद्देशाने राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान (टप्पा १) राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणेतून सुरू करण्यात आलेले हे अभियान राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात तालुका व मंडळ स्तरावर तसेच नगर परिषद/नगर पंचायतस्तरावर राबविण्यात येणार आहे.

**अभियानाची पार्श्वभूमी आणि उद्दिष्टे**

मागील काही वर्षांत महसूल विभागामार्फत अनेक धोरणात्मक सुधारणा करण्यात आल्या आहेत. अकृषिक रूपांतरणासाठी जिल्हाधिकाऱ्यांची स्वतंत्र परवानगी आवश्यक नसणे,सनद प्रणाली संपुष्टात आणणे,एकवेळचे अधिमूल्य भरण्याची नवी सुलभ तरतूद,तुकडेबंदी कायद्यातील सुधारणा,अभिलेख अद्ययावतीकरण आणि डिजिटल ७/१२ ला कायदेशीर वैधता देणे यांसारख्या निर्णयांमुळे प्रशासन सुलभ झाले आहे.या सुधारणांचा लाभ ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष जनजागृती आणि तीव्र प्रसार मोहीम राबविणे आवश्यक असल्याने हे अभियान सुरू करण्यात आले आहे.

**कालावधी आणि शिबिरांचे वेळापत्रक**

माहे मार्च ते माहे मे २०२६ या कालावधीत हे अभियान राबविण्यात येणार आहे.दि. १८ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२६ या कालावधीत मंडळ स्तरावर पूर्वतयारी केली जाणार आहे.७ व १४ मार्च २०२६ रोजी मार्च महिन्यातील शिबिरे,१० व १७ एप्रिल २०२६ रोजी एप्रिल महिन्यातील शिबिरे, तसेच ८ व १५ मे २०२६ रोजी नगर परिषद/नगर पंचायत स्तरावर शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.या शिबिरांद्वारे नागरिकांना डळपसश्रश ऊ डर्शीीळलश ऊाश्रळींशीसंकल्पनेनुसार एकाच दिवशी विविध महसूल सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

**पूर्वतयारीतील महत्त्वाचे मुद्दे**

शिबिरांपूर्वी भोगवटदार वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये परावर्तित करून अद्ययावत ७/१२ वितरित करणे, 'जिवंत ७/१२' मोहिमेद्वारे प्रलंबित नोंदी दुरुस्त करणे,सामाजिक अर्थसहाय्य योजनांतील अर्ज मंजूर करून आदेश तयार ठेवणे,तुकडेबंदी कायद्याविरोधातील व्यवहारांची गावनिहाय यादी तयार करणे, फेरफार प्रक्रिया पूर्ण करणे आणि शाळांमधील विद्यार्थ्यांचे दाखले 'कॅम्प मोड'मध्ये तयार ठेवणे या सूचना देण्यात आल्या आहेत. पाणंद रस्त्यांच्या प्रशासकीय मान्यतेचे आदेश ग्रामपंचायतींना देणे तसेच 'सर्वांसाठी घरे' योजनेंतर्गत प्रलंबित पट्टे वाटप पूर्ण करणे हेही पूर्वतयारीचा भाग आहे.

**शिबिरामध्ये उपलब्ध सेवा**

शिबिरांमध्ये प्रलंबित व विवादग्रस्त फेरफार निकाली काढणे,अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्कद्वारे ७/१२ मधील त्रुटी दूर करणे,लोकसेवा हक्क कायद्यानुसार उत्पन्न,रहिवासी, जात,नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्रांचे वितरण करणे या सेवा उपलब्ध असतील.अकृषिक (छ-) रूपांतरणासंदर्भातील कलम ४२ मधील सुधारणा,सनद प्रणाली संपुष्टात येणे,एकवेळचे अधिमूल्य भरण्याची नवी टक्केवारी पद्धत (१००० चौ.मी.पर्यंत ०.१%, १००१-४००० चौ.मी.०.२५%, ४००० पेक्षा जास्त ०.५%) याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल.

महाभूमी पोर्टलवरून डाउनलोड केलेल्या क्यूआर कोडयुक्त डिजिटल ७/१२ ला कायदेशीर वैधता प्राप्त झाल्याची माहिती देऊन प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर केले जाईल. गाव दप्तर अद्ययावत करण्यावर भर.भूसंपादन व अकृषिक परवानगी दिलेल्या प्रकरणांत कमी-जास्त पत्रके तयार न केल्यामुळे निर्माण होणाऱ्या कायदेशीर अडचणी टाळण्यासाठी सर्व प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन गाव नमुना ७/१२,गट नकाशे व इतर अभिलेख अद्ययावत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

"Ease of Doing Business' व एक खिडकी व्यवस्था : समाधान शिबिरामध्ये एक खिडकी (Single Window) प्रणाली राबविण्यात येणार असून तहसीलदार,नायब तहसीलदार,मंडळ अधिकारी,तलाठी एकाच ठिकाणी उपलब्ध राहून नागरिकांना तात्काळ सेवा देतील.ई-मोजणी,अ‍ॅग्रीस्टॅक,पीएम किसान व तक्रार निवारण सेवा शिबिरात उपलब्ध असतील.

**अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या**

जिल्हाधिकारी यांनी शिबिरांच्या तारखा जाहीर करून सर्व विभागांचा समन्वय साधणे,संपर्क अधिकारी नेमणे आणि अहवाल विभागीय आयुक्तांकडे सादर करणे. उपविभागीय अधिकारी यांनी पूर्वतयारीचा आढावा घेऊन समन्वय साधावा.तहसीलदार यांनी मंडळस्तरावर सर्व विभागांच्या बैठका घेऊन शिबिराचे प्रभावी आयोजन करावे,लोकप्रतिनिधींना निमंत्रित करावे,महिला बचत गट व स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घ्यावे आणि त्याची व्यापक प्रसिद्धी करावी.

**जिल्हास्तरीय समन्वय समिती :**

अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन/रोहयो),जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,सह जिल्हा उपनिबंधक, जिल्हा जलसंधारण अधिकारी, उपवनसंरक्षक (प्रादेशिक),जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख आदी सदस्य असतील. निवासी उपजिल्हाधिकारी हे सदस्य सचिव म्हणून कार्य करतील.

**अभियानाचे महत्त्व :**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान – टप्पा १ हे केवळ शिबिर नसून प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी करणारी व्यापक लोकाभिमुख चळवळ आहे. महसूलविषयक गुंतागुंत कमी करून त्वरित सेवा देणे,डिजिटल सक्षमीकरण वाढविणे,पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्र्चित करणे आणि शासन निर्णयांचा थेट लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे हा या अभियानाचा मूलभूत हेतू आहे.हे अभियान प्रभावीपणे राबविल्यास महसूल प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि जनकेंद्रित होईल,असा विश्र्वास व्यक्त करण्यात येत आहे.

**– संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय**
**धाराशिव**

## ओम नम: शिवाय...

सर्वांना आंतरराष्ट्रीय महिला दिनाचा खूप - खूप शूभेच्छा. ८ मार्च हा सर्वत्र सहर्ष उत्साहाने साजरा केला जातो. या वेळेची टीम आहे "GIVE TO GAIN" म्हणजे बदलाचे नेतृत्व : शाश्र्वत भविष्य घडवणाऱ्या महिला

स्त्रियांमधे 5 C असतात.
COURAGE - साहस
CREATIVITY- कल्पकता
CONFIDANCE- आत्मविश्वास
COMMUNIVATION- संवाद कौशल्य
AND CHANGE - बदल

या ५ च्या मदतीने प्रत्येक स्त्री अनेक आघाडी सर करू शकते. घर, ऑफिस, खेळ किंवा शाळा, कॉलेज, राजकारण या क्षेत्रामध्ये उत्तुंग प्रगती करू शकते. इंदिरा गांधी, बहिणाबाई, सानिया नेहवाल, माता जिजाऊ, तारा राणी, झाशीची राणी अशी अनेक उदाहरणे समोर आहेत.

भारत हा आपला समाज पाश्चिमात्य विचारसरणीकडे झुकला आहे. सामाजिक व सांस्कृतीक बदल खूप झपाटयाने व वाढत आहे. उपभोग्य वस्तूचा प्रचंड वापर सुरु आहे.भौतिक सुखसोयीची रेलचेल आहे. सर्वत्र ENJOAYMENT हाच आयुष्याचा उद्देश दिसत आहे लिव्हिंग, रिलेशनशिप SICHUVESION (सिचवेशनशीप) OPEN RELATION SHIP, (संधीसाधू नाते) रोज नवीन गोष्टी समोर येत आहेत.

मद्यप्राशन, व्यसन धीनता खूप वाढली आहे. स्त्रीसुरक्षा ऐरणीवर मांडली आहे.

स्वातंत्र्यासोबत जबाबदारी सुद्धा शिकविणे ही सर्व स्त्रियांची महत्वाची जबाबदारी आहे .बदलत्या जीवनशैली मुळे मानसिक आरोग्य धोक्यात आले आहे. इंटरनेट, अश्लील साहित्य, ओटीटी प्लॅटफॉर्म यामुळे भावनिक बदल सुरु झाले आहे. विवाहसंस्था व सामाजिक आरोग्य खूप धोक्यात आले आहे.

सर्व स्त्रियांना एकत्र येऊन व्यसनाधीनता,सांस्कृतिक बदल यांना लढा दयायचा आहे. हा लढा घरापासून, स्वतःपासून ते समाजापर्यंत असणार आहे. जागृती स्वतःमध्ये करावी लागेल. डोळयावर स्वार्थीपणाचा, स्वातंत्र्याचा चष्मा स्वीकारलेल्या पिढीला, चारित्र्य संवर्धनाचे धडे शिकविणे ही आजच्या काळाची गरज आहे.प्रत्येक स्त्रीमध्ये जिजाऊमाता आहेत. घरोघरी छत्रपती शिवाजी महाराजांचे, गाथांचे पारायण होणे गरजेचे आहे. आर्थिक साक्षरता सर्वस्तरापर्यत पोहचणे गरजेचे आहे.

आपल्यातील अंगभूत 5 C वापर करून आजच्या बदलाला यशस्वीपणे सामोरी जाऊन सुरक्षित,सुदृढ व विकसित समाज निर्मिती होऊ शकते. मोबाईलचा अतिवापर, जंकफूड, अपुरी झोप,वाढलेले वजन, रक्तदाब - मधुमेह यासारख्या आजारांचे वाढलेले प्रमाण, शारीरिकदृष्ट्या अनेक समस्यांना तोंड दयावे लागतात.

सकारात्मक विचारसरणी,नियमित व्यायाम,व समतोल आहार ही निरोगी आरोग्याची गुरुकिल्ली आहे. सर्वांना आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या खूप - खूप आरोग्यमय शुभेच्छा.

आनंदी राहा,निरोगी राहा. !!

**– डॉ. मनिषा कल्याण बरमदे,**
**बरमदे हॉस्पिटल, आदर्श कॉलनी,**
**औसा रोड, लातूर- ४१३५३१.**
**मोबाईल नं . ७६२०३ ०२९९७.**

००००००००००००००००००००००००००००००

## अंडी खाल्ल्याने खरोखरच कोलेस्ट्रॉल वाढते का? जाणून घ्या दररोज किती अंडी खावीत



आरोग्याच्या बाबतीत, सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे काय खावं आणि काय खाऊ नये. मात्र, काही पदार्थ असे आहेत. जे आहारात समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यापैकी एक म्हणजे अंडी. अंडी प्रथिनांचा एक उत्कृष्ट स्रोत मानले जातात. परंतु अंडी खाण्याबद्दल एक मोठी गोष्ट म्हणजे ते किती प्रमाणात खाल्ल्याने कोलेस्टेरॉलची पातळी वाढते. याबद्दल अनेकांना माहिती नाही. परंतु अंडी खाल्ल्याने खरोखरच कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते काय? नियमितपणे किती अंडी खाणे आरोग्यासाठी चांगले आहे आणि अंडी खाणं चांगलं आहे की वाईट? ते पाहूया

अंडी खाल्ल्याने खरोखरच कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते का? अंडी हे पौष्टिकतेने समृद्ध असलेले सुपरफूड आहे, काही जण अंड्यांना शाकाहारी मानतात तर काही जण मांसाहारी. अंडी हे प्रथिनांचे एक उत्तम स्रोत आहेत. जिममध्ये जाणारे बहुतांश लोक अंडी आवडीन खातात. हैदराबादमधील अपोलो हॉस्पिटलमधील न्यूरोलॉजिस्ट डॉ. सुधीर कुमार यांच्या मते, अंड्यांमध्ये प्रथिने खूप जास्त असतात, परंतु काही लोकांना भीती वाटते की, अंड्याचा पिवळा भाग खाल्ल्याने त्यांचे कोलेस्टेरॉल वाढू शकते. मात्र, हे खरे नाही. डॉ. सुधीर कुमार म्हणतात की, अंड्यांमध्ये कोलेस्टेरॉल असते, परंतु आहारातील कोलेस्ट्रॉल रक्तातील कोलेस्टेरॉल वाढवत नाही. तुम्ही कोणत्याही भीतीशिवाय कमी प्रमाणात अंडी खाऊ शकता. अंडी खाल्ल्याने प्रथिने आणि आवश्यक पोषक तत्वे मिळतात. दररोज एक ते दोन अंडी खाल्ल्याने तरुणांमध्ये कोलेस्टेरॉलच्या पातळीवर कोणताही परिणाम होत नाही.

अंडी तुमच्या आरोग्यासाठी चांगली आहेत का?अंड्यांमध्ये प्रथिने आणि विविध पोषक तत्वे भरपूर असतात. सुधीर कुमार यांच्या मते, त्यात जीवनसत्त्वे बी१२, डी आणि ए, तसंच खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्स असतात. अंड्यांमध्ये चरबी कमी असते. म्हणून, ते संतुलित आहार आणि चांगले पौष्टिक मूल्य प्रदान करतात. तज्ज्ञांच्या मते, अंडी स्नायूंना बळकट करण्यासाठी खूप फायदेशीर आहेत, विशेषत: वृद्धांमध्ये. तज्ञ असंही म्हणतात की, हे एखाद्या व्यक्तीच्या आरोग्य स्थिती आणि आहारावर अवलंबून असते. अनेक अभ्यासात असं आढळून आलं आहे की, अनेक लोकांना अंडी कमी प्रमाणात खाल्ल्याने अनेक पोषक तत्वे मिळतात. मात्र, मधुमेह आणि हृदयरोग असलेल्या लोकांना अंडी खाण्यापूर्वी त्यांच्या डॉक्टरांचा सल्ला घेण्याचा सल्ला दिला जातो.

किती अंडी खाणे सुरक्षित आहे? हेल्थलाइनमधील एका अहवालानुसार, जर आहारात कोलेस्ट्रॉल कमी असेल तर तुम्ही जास्त प्रमाणात अंडी खाऊ शकता. परंतु जर तुमच्या आहारात कोलेस्ट्रॉल जास्त असेल, तर कमी अंडी खाणं चांगलं. काही संशोधन असं सूचित करतात की, दररोज १ ते २ अंडी खाणे सुरक्षित आहे. हृदयाच्या आरोग्यासाठी ते फायदेशीर ठरू शकते. ३८ निरोगी प्रौढांच्या एका लहानशा अभ्यासात असं आढळून आलं की, दररोज तीन अंडी खाल्ल्याने एलडीएल (वाईट) आणि एचडीएल (चांगले) कोलेस्ट्रॉल पातळी तसंच एलडीएल-ते-एचडीएल गुणोत्तर सुधारते. मात्र, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की हा एक लहान अभ्यास होता आणि तज्ञ सामान्यत: दररोज १-२ अंडी खाण्याची शिफारस करतात, जे बहुतेक लोकांसाठी सुरक्षित मानले जाते.

# नितिश 'राज'ची अखेर






विरोधी पक्षांवर भाजप सातत्याने घराणेशाहीचा आरोप करत असतो; मात्र आपल्या किंवा मित्र पक्षातील घराणेशाही त्यांना चालते. नितीश यांचे चिरंजीव निशांत राजकारणात प्रवेश करत आहेत, हे त्याचेच द्योतक आहे. राज्यसभेच्या आगामी निवडणुकीसाठी आपली उमेदवारी नितीश कुमार यांनी जाहीर केली आणि आपण बिहार- चे मुख्यमंत्रिपद सोडत असल्याचे सूचित केले. तरीही त्यांनी अजून पदाचा राजीनामा दिलेला नाही. नितीश मुख्यमंत्रिपद सोडणार अशी शंका आणि शक्यता गेले काही आठवडे व्यक्त केली जात होती; पण ते इतक्या लवकर प्रत्यक्षात येईल असे वाटले नव्हते. राज्य सभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा कालचा शेवटचा दिवस असल्याने त्या पूर्वी निर्णय होणे आवश्यक होते. संयुक्त जनता दलाचे वरिष्ठ नेते व नितीश यांच्या कुटुंबीयांनी त्यांनी मुख्यमंत्रिपद सोडू नये यासाठी त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केल्याचे प्रसिद्ध झालेल्या वृत्तांमध्ये म्हटले आहे. नितीश यांचे चिरंजीव निशांत यांना बिहारमधून राज्यसभेसाठी उमेदवारी देण्याचे घाटत होते; पण निशांत यांनी राज्यातूनच आपल्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात करण्यात रस दाखवला. ही चर्चा सुरू असताना, भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने नितीश यांनी राज्यसभेवर जावे व आपला उत्तराधिकारी सांगावा असे 'सुचवले'. त्यानंतर नितीश यांचा निर्णय झाल्याचे प्रसिद्ध झालेल्या बातम्यांवरून जाणवते. निशांत यांना लगेचच मुख्यमंत्री केले जाणार नाही हे नक्की. भाजपचा नेता त्यांची जागा घेण्याची शक्यता दाट असल्याने त्या पक्षाचे एक स्वप्न पूर्ण होणार आहे.

**बिहार बळकावला**–गेल्या नोव्हेंबरमध्ये नितीश मुख्यमंत्री झाले तेव्हा सलग दहा वेळा त्या पदाची शपथ घेण्याचा विक्रम त्यांच्या नावे नोंदला गेला. २००० मध्ये ते प्रथम बिहारचे मुख्यमंत्री झाले. त्यापूर्वी १५ वर्षे ते लोकसभेत होते. वाजपेयी सरकारमध्ये ते रेल्वे मंत्री होते. राजकारण आणि प्रशासन चालवणे यांचा त्यांना मोठा अनुभव आहे. समाजवादी विचारवंत व नेते राम मनोहर लोहिया यांचे शिष्य म्हणवून घेणारे नितीश सत्तेसाठी कोणाशीही हातमिळवणी करण्यात वाकबगार आहेत. गेल्या लोकसभा निवडणुकीपूर्वी ते विरोधकांच्या 'इंडिया' आघाडीचे निमंत्रक होते; मात्र ऐन निवडणुकीच्या आधी त्यांनी भाजपच्या कळपात प्रवेश केला आणि आपले मुख्यमंत्रिपद टिकवले. त्यास राजकीय चातुर्य म्हणावे, की संधीसाधूपणा ते कळत नाही. बिहारमध्ये गेल्या वर्षीच्या अखेरीस झालेली निवडणूक 'एनडीए'ने त्यांच्याच नेतृत्वाखाली लढवली. महिलांना रोख मदत देण्याच्या त्यांच्या योजनेने संयुक्त जनता दलास ८५ जागा मिळवून दिल्या. आधीच्या निवडणुकीच्या तुलनेत त्यांना ४२ जागा जास्त मिळाल्याने भाजपही चकित झाला. नितीश यांना मुख्यमंत्री करण्यावाचून भाजप पुढे पर्याय नव्हता. त्यामागे 'थांबा आणि वाट पाहा' असे धोरणही असू शकते. याचे कारण नितीश यांचे वय व प्रकृती त्यांना अनुकूल नाही. ढासळत्या प्रकृतीमुळे त्यांना मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी पेलणे अवघड जात असल्याचे बोलले जात होते. राज्याचा कारभार नोकरशाही चालवत असल्याचे चित्र निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर नितीश कधी ना कधी मुख्यमंत्रिपद सोडणार हे निश्चित झाले होते. त्या नंतर काय, हा मोठा प्रश्न होता. राज्यसभेची उमेदवारी देऊन भाजपने तो सोडवला. विधान सभा, विधानपरिषद, लोकसभा व आता राज्यसभा अशा विधिमंडळाच्या चारही सभागृहांचे सदस्य होण्याचा विक्रमही नितीश यांच्या नावावर जमा होईल. राज्याच्या मुख्यमंत्रिपदी कोण येणार ? या प्रश्नाचे उत्तर फार अवघड नाही. संख्याबळामुळे भाजपकडे ते पद येणार हेही नक्की आहे. उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांचे नाव या शर्यतीत आघाडीवर आहे. ते कुशवाहा समाजाचे वजनदार नेते आहेत. राज्यात यादव समाजानंतरचा हा मोठा इतर मागास-वर्गीय समाज आहे. केंद्रीय गृहखात्याचे राज्यमंत्री नित्यानंद राय यांचेही नाव चर्चेत आहे. ते यादव समाजाचे आहेत. त्यांच्या आधारे लालू प्रसाद यादव यांच्या मतपेढीत शिरकाव करणे भाजपला शक्य होणार आहे. येथे व्यक्ती गौण आहे. हिंदी भाषक पट्ट्यातील आणखी एका मोठ्या राज्याची सत्ता हस्तगत करण्याची भाजपला संधी मिळाली आहे ती पक्ष गमावणार नाही. राज्यसभेत जाण्याने नितीश यांच्या राजकीय कारकीर्दीचा अखेरचा टप्पा सुरू झाला आहे.

# जन हे सुखाचे...



आम्ही दोघे आमची पेन्शन आणि इतर उत्पन्नात सुखाने राहतो. कधी अडचण आली तर, मुले पैसे धाडतात. आम्ही आमचा आरोग्यविमा काढला आहे. आम्हाला आता कशाची चिंता नाही... वर दिल्याप्रमाणे आयुष्य सुरक्षित केले की, सर्व प्रश्न सुटले, असे कोणालाही वाटू शकेल. त्यात चूक काही नाही; पण अशा आयुष्यातही शेवटच्या टप्प्यात मोठी दुःखे सामोरी येऊ शकतात. अशावेळी संत तुकारामांच्या पुढील अभंगाची आठवण द्यावीशी वाटते.

**।। जन हे सुखाचे, दिल्याघेतल्याचे, अंत हे काळीचे नाही कोणी।।**

या लेखात एका प्रसिद्ध कलाकाराची कहाणी थोडक्यात सांगणार आहे. गेल्या शतकात अतिशय गाजलेल्या या कलाकाराची पहिली पत्नी मध्यमवयातच निवर्तली होती. यानंतर त्यांनी कलाक्षेत्रातीलच सहचारिणीची निवड केली. पन्नाशीनंतरची काही वर्षे तिच्या सहवासात सुरक्षितपणे पार पडली; पण दुर्दैवाने तिचे देखील मधुमेहाने निधन झाले. आता नटवर्य एकटे पडले. पक्षाघातामुळे त्यांचे दोन्ही पाय लुळे पडले होते. हालचालींवर निर्बंध आले होते. गाठीला बर्यापैकी पैसा होता. साठच्या दशकात जेव्हा दोन अडीचशे रुपयात मध्यमवर्गीय चौकोनी कुटुंबे सुखाने संसार करीत होती. त्या काळात नटवर्यांना शासनाने दरमहा आठशे रुपये पेन्शन दिली होती. असे असूनही एकटे पडल्याने त्यांचे हाल झाले. गाठीशी पुरेसा पैसा असूनही 'चणे आहेत तर, दात नाहीत' अशी स्थिती होती.

त्या काळी आरोग्यविमा फारसा प्रचलित नव्हता. त्यामुळे येणारा पैसा उपचारात जात होता. नात्यातील नसलेल्या दोन तरुण व्यक्ती त्यांची सर्व शुश्रूषा करीत. भूक मेली होती. दिवसातून दोनदा फक्त वाटीभर दूध पोटात जाई. मध्यम वयात पहिली पत्नी आणि उतारवयात दुसरी पत्नी देखील निवर्तली होती. मुलगी जवळ नव्हती. माणसाला किती एकाकी वाटत असेल. जगण्याची इच्छा कणाकणाने मरून गेली असेल. अशातच त्यांना मोतीबिंदूने गाठले, नजर गेली. पाठोपाठ अल्झायमर आला. काही दिवस त्या जर्जर देहाने तग धरला आणि शेवटी स्वतःला मृत्यूच्या स्वाधीन केले. ही हकीकत सांगण्याचा काही उद्देश आहे. आज एखाद्याच्या आयुष्यात असे झाले असते तर, डॉक्टरांनी कदाचित शारीरिक त्रास कमी केला असता.

**मानसिक त्रास कमी झाला असता**

**का?**

उतारवयात जोडीदार गमावलेल्या अनेक व्यक्ती हल्ली सोबत हवी म्हणून लिव्हइनचा मार्ग धरतात. त्यात गैर नाही; पण आजारपण सांगून येत नाही. जन्मतारखेच्या हिशेबाने मृत्यू येत नाही. भूलोकावर कोणी किती वेळ, सोबतीने की, एकट्याने थांबायचे हे ठरवणारी शक्ती अज्ञात आहे. आपण फक्त आपली तब्येत सांभाळू शकतो. नव्या जोडीदारासह लिव्हइनमध्ये राहू लागलेल्या दोघांपैकी कोणी ना कोणी आधी आजारी पडू शकतो, आधी जाऊ शकतो आणि दुसरी व्यक्ती पुन्हा एकटी पडू शकते. या दुष्टचक्राला अंत नाही. मुलांपासून कोणत्याही कारणाने दूर राहणार्या वृद्ध जोडप्यांमधील एका व्यक्तीला ही समस्या केव्हातरी येण-ारच आहे. आधी अनेक वर्षे दोघांनी एकटे जगल्यावर जोडीदार जेव्हा जातो तेव्हा कदाचित साठी उलटलेली मुले-मुली त्यांना त्यांच्या घरात बोलावतात; पण मुले-मुली नातवंडे परिचित असली तरी, आता हे नवे ठिकाण परके वाटू शकते, इथे रुजता येत नाही.

वृद्ध जोडप्यांनी स्वतंत्र राहण्यापेक्षा वेळेवरच आपापल्या बजेटनुसार वृध्दाश्रम निवडला तर, निदान आसपास समवयस्कांची सोबत राहील, त्यांच्या सहवासात रुजायला पुरेसा अवधी मिळेल, असे वाटते. कोण जाणे, कदाचित समवयस्कांच्या मानसिक सोबतीत आयुष्याची रेघ थोडी मोठी देखील होईल. आरोग्यविमा घेतला म्हणजे आपण अनेक रोगांवरील उपचारांच्या खर्चापासून सुरक्षित राहतो, ही गोष्ट खरी. पण, बिछान्याला खिळलेल्या व्यक्तीच्या शुश्रूषेचा, देखभालीचा (नर्सिंग) खर्च देणारा विमा अद्याप नाही; पण काही वृध्दाश्रम बिछान्याला खिळलेल्या सभासदांच्या शुश्रूषेचे आश्वासन देताना दिसतात. तो सामूहिक खर्च कदाचित आवाक्यात राहू शकेल.

**आपण- की जे अद्याप पुरेसे वृद्ध झालेलो नाहीत, जात्यात नसलो तरी सुपात आहोत- असे आपण या वृध्दांसाठी काय करू शकतो? जमेल तसे घराजवळील वृध्दाश्रमाला भेट देऊन आपल्या परीने त्यांना दिलासा देऊ शकतो, सोबत करू शकतो, त्यांना रिझवू शकतो. एकमेकांना शापित होण्यापासून वाचवू शकतो.**

# दात आणि हिरड्यांचे आरोग्य राखण्यासाठी



दिवसातून दोनदा (सकाळी आणि रात्री झोपण्यापूर्वी) ब्रश करणे, दररोज फ्लॉसिंग करणे, आणि साखरयुक्त पदार्थ कमी खाणे आवश्यक आहे. विकिपीडिया https://en.wikipedia.org.en2mr.search.translate.goog/wiki/Oralšhy, Link: Sakra World Hospital वर नमूद केल्याप्रमाणे, दंतचिकित्सकाकडून नियमित तपासणी (दर ६ महिन्यांनी) करणे हिरड्यांचे आजार टाळण्यास मदत करते ३, ६.

दात स्वच्छ ठेवण्यासाठी महत्त्वाच्या टिप्स:

नियमित ब्रशिंग: फ्लोराईडयुक्त टूथपेस्ट वापरून सकाळी आणि रात्री दात घासावेत छखक १.

फ्लॉसिंग (Flossing): दिवसातून एकदा दात स्वच्छ करणे गरजेचे आहे, ज्यामुळे दोन दातांमधील अन्नाचे कण निघून जातात १.

जीभ साफ करणे: श्वासाची दुर्गंधी टाळण्यासाठी जीभ साफ करणे महत्त्वाचे आहे ३.

गोड पदार्थ टाळा: चॉकलेट्स आणि साखरेचे पदार्थ कमी खावे, कारण त्यामुळे दातांत कीड लागते ४.

लवंग तेल: दातदुखीसाठी लवंग तेल किंवा कोमट मिठाच्या पाण्याने गुळण्या करणे तात्पुरते फायदेशीर ठरू शकते उेश्रसरींश २.

दंतचिकित्सक सल्ला: जर दातांमध्ये संवेदना (Sensitivity) असेल, तर त्वरित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा




खरं तर शीघ्रपतन हा काही आजार नाही. ती एक सवय आहे. पुरुषांच्या लैंगिक प्रतिसादात लैंगिक उत्तेजना, शिश्नाची ताठरता व वीर्यस्खलन या प्रक्रिया होतात. स्खलन झाल्यानंतर ताठरता कमी होत-होत नष्ट होते. शीघ्रपतनावर उपचार करताना या लैंगिक प्रतिसादावर विशेष लक्ष द्यावं लागतं.डॉ. संजय देशपांडे, कन्सल्टंट सेक्सॉलॉजिस्टखरं तर शीघ्रपतन हा काही आजार नाही. ती एक सवय आहे. **(क्रमश. )**

## २ Joke विनोद




आईने सोनूला विचारले, 'तू इथे ठेवलेली बिस्किटे खाल्लीस का?' सोनू म्हणाला, 'मी एकाला हात लावला नाही.' तेव्हा आई म्हणाली, 'इथे तर एकच शिल्लक आहे.' 'त्यालाच मी हात लावला नाही.' सोनू म्हणाला.

## ३ Message संदेश



FARHAN & RANCHO
scooty pe Ghumne gaye..
Achanak RANCHO Urr gaya
Q? Qki
Behti Hawa sa, tha w0
Urti Patang
sa tha W0
Ab Msg Padhna Band Karo Or
RANCHO kahan gaya usey DHUNDO...

## ४ Thought सुविचार




विज्ञानात आत्मज्ञान आले तर सर्वोदय होईल.
– विनोबा भावे

**संस्कृत सुभाषित**

**अधनाद्धि निवर्तन्ते ज्ञातयः सुहृदो द्विजाः :**
**अपुष्पादफलाद्वृक्षाद्यथा कृष्ण पतत्रिणः।।**

(उद्योगपर्व, अध्याय ७२, क २० महाभारत)अर्थ : ज्याप्रमाणे पक्षी पुष्परहित व फलरहित वृक्षाचा त्याग करतात, त्याप्रमाणे दरिद्री मनुष्याचे नातलग व इष्टमित्र त्याला सोडून जातात.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



## आडवे शब्द

१. रमेश देवबरोबरच्या या सिनेमात सीमा खलनायिका होती
६. ऐनवेळी कच खाणारा
११. न्याय
१२. सोशिकपणा
१४. नवरा
१५. अरण्य
१६. लोटी
१८. उगवत्या सूर्याचा देश
२१. च्या पुढे, समक्ष
२३. वेळेचा कमीत कमी भाग
२४. विरोध, प्रतिबंध
२७. पत, प्रतिष्ठा
२८. शंकराजवळचे चर्मवाद्य
२९. टप्प्याने टप्प्याने केलेला प्रवास
३२. अवधान, लक्ष
३३. भडक
३६. पळून जाणे
३९. कलावंत
४१. मत नोंदवण्याचा कालबाह्य कागद
४४. सोसाट्याचा वारा
४५. पवित्र
४६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४९. परिस्थिती, कालाचे परिमाण
५२. सामान
५३. बस्तान
५४. मज्जाव
५६. आश्रय, थारा
५८. प्रकाश निर्माण करणारा सूर्य
६०. वाहणारी हवा
६१. जन्मदाते
६३. पाणी
६५. दक्ष
६६. यजमान
६७. आरोप, बालंट
६८. प्रयाण
६९. लोकमानस
७१. इच्छा, आकांक्षा (हिंदी)
७३. आपल्या उत्तर सीमेवरील एक राष्ट्र
७५. किंचित ओलावलेले (डोळे) (हिंदी)
७६. कामाचा उरका
७८. शिव
८०. अवाजवी
८२. भाजपा नेते 'नितीन ----'
८४. संथ
८५. स्तुतीची गाणी
८६. दुःखी होणे, वेदनेने ओरडणे

## उभे शब्द

१. लकब
२. खिशाला चाट
३. धास्ती, भीती
४. आपले राष्ट्रगीत
५. आलटापालट
७. खून
८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
९. डोसा
१०. शरीर, काया
१३. गलबताचे कापड
१७. भाकरी व इतर पदार्थांचा कुस्करा, दूधभाकरी
१९. वैमानिक (इंग्रजी)
२०. अंकुर
२२. रम्य, मनोहर
२५. दात
२६. अंधार
२७. फोडणीचे वरण
३०. प्रचंड
३१. जपजाप्य
३४. बगळा
३५. थेळ, सरळ
३७. लोकरीचा एक प्रकार
३८. लग्नकार्याचे लेखी आमंत्रण
४०. लबाडीचा हेतू
४२. सर्वस्वाने
४३. यापेक्षा 'आज' महत्त्वाचा
४५. पालनपोषण करणारा
४७. शोभणारा
४८. मृत्यूदेवता
५०. जयश्री गडकरचा चंद्रकांत गोखले यांच्या बरोबरचा गाजलेला चित्रपट
५१. नूतन
५२. तंबाखूचा असल्यास घातक
५५. मानबिंदू (ला.)
५७. कमळ
५८. दिवस
५९. कणीदार
६०. संसारातून अंग काढून घेणे
६१. सुखाच्या मोजमापाचे धान्य
६२. दाह, मत्सर
६४. मिरवणूक
६५. पत्राचा कालबाह्य झालेला मायना
६६. नम्रतेने मान खाली घालणे
६७अ. आल्या पावली, लगेच
७०. 'राही --- दुख की चिंता क्यों सताती है' (दोस्ती)
७२. थकवा
७४. सांभाळ
७७. खाली खेचणे, पराभूत करणे
७८. अधिकाराचे स्थान
७९. त्रासलेला
८०. शर्त
८२. माराची उठलेली खूण
८३. अस्वल

## आडवे उत्तरे

१.अपराध ६.अवसानघातकी ११.दाद १२.सहनशीलता १४.धव १५.वन १६.गडवा १८.जपान २१.समोर २३.क्षण २४.हरकत २७.आब २८.डमरू २९.मजलदरमजल ३२.भान ३३.बटबटीत ३६.पलायन ३९.कलाकार ४१.मतपत्रिका ४४.वादळ ४५.पाक ४६.पसायदान ४९.कालमान ५२.माल ५३.जम ५४.मना ५६.निवारा ५८.दिवाकर ६०.वारा ६१.जनकजननी ६३.जीवन ६५.सावध ६६.नवरा ६७.किटाळ ६८.प्रस्थान ६९.जनमत ७१.तमन्ना ७३.नेपाळ ७५.नम ७६.रपाटा ७८.पवित्र ८०.अव-ास्तव ८२.गडकरी ८४.मंद ८५.स्तवन ८६.कळवळणे

## उभे उत्तरे

१.अदा २.पदरमोड ३.धसका ४.जन गण मन ५.हलवाहलवी ७.वध ८.सावज ९.घावन १०.तन १३.शीड १७.भाकरकाला १९.पायलट २०.कोंब २२.रमणीय २५.रद २६.तम २७.आमटी ३०.जबरदस्त ३१.जपतप ३४.बक ३५.तडक ३७.नमदा ३८.पत्रिका ४०.कावा ४२.तनमनधनाने ४३.काल ४५.पालक ४७.साजरा ४८.यम ५०.मानिनी ५१.नवा ५२.मावा ५५.नाक ५७.राजीव ५८.दिन ५९.रवाळ ६०.वानप्रस्थ ६१.जव ६२.जळजळ ६४.वरात ६५.सा न वि वि ६६.नतमस्तक ६७अ.टाकोटाक ७०.मनवा ७२.मरगळ ७४.पालन ७७.पाडणे ७८.पद ७९.त्रस्त ८०.अट ८२.वळ ८३.रीस




# बहुप्रतीक्षित ‘टॉक्सिक’ची रिलीज तारीख पुढे ढकलली; या तारखेला उघडणार पडदा




मुंबई : कन्नड स्टार यशच्या बहुचर्चित ‘टॉक्सिक: ए फेरी टेल फॉर ग्रोन-अप्स’ या चित्रपटाबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. जगभर १९ मार्चला प्रदर्शित होणार असल्याची घोषणा करण्यात आलेला हा सिनेमा आता त्या तारखेला थिएटरमध्ये येणार नाही.
‘रॉकी भाई’च्या कमबॅकची चार वर्षांपासून रंगलेली चर्चा चाहत्यांना पुन्हा प्रतीक्षा करायला लावणारी ठरली आहे.

जागतिक तणावाचा फटका

निर्मात्यांच्या मते, मध्यपूर्वेतील अस्थिर वातावरण आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील तणावाचा परिणाम वितरणावर होण्याची शक्यता आहे. ‘टॉक्सिक’ हा चित्रपट जागतिक बाजारपेठ डोळ्यासमोर ठेवून तयार करण्यात आला आहे. कन्नडसोबतच इंग्रजी भाषेतही शूटिंग करण्यात आल्याने परदेशातील प्रदर्शनाला विशेष महत्त्व होते. मात्र सध्याच्या परिस्थितीत जागतिक रिलीज करणे धोकादायक ठरू शकते, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यशची अधिकृत भूमिका सोशल मीडियावर चाहत्यांशी संवाद साधताना यशने स्पष्ट केले की, प्रेक्षक आणि वितरण भागीदारांचे हित लक्षात घेऊन प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. नवीन नियोजनानुसार हा हाय-ऑक्टेन क्शन ड्रामा आता ४ जून २०२६ रोजी थिएटरमध्ये दाखल होणार आहे.

दमदार स्टारकास्ट

दिग्दर्शक गीतू मोहनदास यांच्या या चित्रपटात गीतू मोहनदास दिग्दर्शित या चित्रपटात नयनतारा, कियारा अडवाणी, हुमा कुरेशी आणि तारा सुतारिया यांसारखी तगडी कलाकार फळी झळकणार आहे.

‘धुरंधर २’ला सोलो रिलीजचा फायदा?

‘टॉक्सिक’ शर्यतीतून बाहेर पडल्याने १९ मार्चला प्रदर्शित होणाऱ्या धुरंधर २ ला थेट फायदा होण्याची शक्यता आहे. बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंगचा हा स्पाय थ्रिलर आता स्पर्धेशिवाय थिएटरमध्ये उतरणार आहे. मोठ्या चित्रपटाची टक्कर टळल्याने बॉक्स ऑफिसवर एकहाती कमाईची संधी निर्माण झाल्याचे चर्चा सुरु आहे.

चाहत्यांची नजर जूनकडे

सध्या ‘टॉक्सिक’च्या नव्या रिलीज डेटची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, पुढील काही महिन्यांत प्रमोशनचा वेग वाढवला जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, मार्चमध्ये बॉक्स ऑफिसवर ‘धुरंधर २’चा दबदबा राहणार का, याकडे चित्रपटसृष्टीचे लक्ष लागले आहे.

## सत्य घटना पण, रहस्यमयी मृत्यू; ८.८ रेटिंग, ही हिंदी हॉरर थ्रीलर सीरिज पाहून थरथर कापाल



ॲमेझॉन प्राईम व्हिडीओच्या एमएक्स प्लेअरवर प्रदर्शित झालेली मभय: द गौरव तिवारी मिस्ट्रीफ ही वेब सीरिज सध्या प्रेक्षकांच्या मनाला भिडतेय.
सध्या ओटीटीमुळे (जढढ) मनोरंजन प्रत्येकाच्या हातात आलंय. आपण कधीही, कुठेही आणि केव्हाही आपल्याला वाटेल तेव्हा अगदी सहज सिनेमे (चेींळशी), वेब सीरिज (थशल डशीळशी) पाहू शकतो. सध्या ओटीटीची (जढढ ठशश्रशरीशव) चलती असल्यामुळे ॲमेझॉन प्राईम व्हिडीओच्या (-रेूप झीळाश तळव-शे) एमएक्स प्लेअरवर (चद झश्ररूशी) प्रदर्शित झालेली मभय: द गौरव तिवारी मिस्ट्रीफ (इहरू: ढहश ऋरीींरी ढळुरीळ चूीींशी) ही वेब सीरिज (थशल डशीळशी) सध्या प्रेक्षकांच्या मनाला भिडतेय. ही सीरिज भारतातील प्रसिद्ध पॅरानॉर्मल एक्सपर्ट गौरव तिवारी यांच्या खऱ्या आयुष्यावर आणि त्यांच्या गूढ मृत्यूवर आधारित आहे. एका प्रसिद्ध घटनेवर आधारित ही कथा केवळ घाबरवणारी नाही तर प्रत्येक वळणावर विचार करायला लावते. मभयफ ही वेब सीरिज रिलीज झाल्यापासून सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनली आहे.

जर तुम्हाला हॉरर थ्रीलर असं काही पाहायचं असेल तर, तुमच्यासाठी ही उत्तम पर्याय ठरेल. नुकताच प्रदर्शित झालेली मभयफ ही सीरिज लोकांना घाबरवते आणि समीक्षकांकडूनही या सीरिजला सकारात्मक प्रतिसाद मिळतोय.
एक अशी कथा जी, तुम्हाला हादरवून टाकेल मभय: द गौरव तिवारी मिस्ट्रीफ ही वेब सीरिज एका थंडगार शवगृहाच्या सीनपासून सुरू होते, जिथे गौरव तिव-ारीचं शवविच्छेदन सुरू आहे. सुरुवातीला पोलीस ती आत्महत्या असल्याचं गृहीत धरतात, पण त्यानंतर त्याच्या मानेवर आढळलेल्या विचित्र खुणा कथेला वेगळ्या दिशेनं घेऊन जातात. त्यानंतर एका लेखकाची एन्ट्री होते, ज्या गौरवच्या जीवनावर पुस्तक लिहायचं आहे आणि तिथेच ही कथा फ्लॅशबॅकमध्ये जाते. या सीरिजमध्ये प्रेक्षकांना पाहायला मिळेल की, एक पायलट होण्याचं स्वप्न पाहण-ारा तरुण पॅरानॉर्मल दुनियेच्या खोलात कसा जातो. रहस्यमय मृत्यू अन् न सुटलेले प्रश्न
फ्लॅशबॅकमध्ये गौरवची इच्छा पायलट बनण्याची होती, पण एक दिवस, विमान चालवत असताना, त्याच्यासोबत असं काहीतरी घडतं, ज्यामुळे तो पॅरानॉर्मल एक्सपर्ट बनण्याचा निर्णय घेतो. या काळात, तो इंडियन पॅरानॉर्मल सोसायटीमध्ये सामील होतो, जिथे तो इतर तीन लोकांसोबत काम करतो. सुरुवातीला, गोष्टी व्यवस्थित होतात, पण पाच वर्षांनी, विचित्र घटना घडू लागतात आणि गौरवचा गूढपणे मृत्यू होतो. मभयफ ही वेब सीरिज तुम्हाला सुरुवातीपासून शेवटपर्यंत खिळवून ठेवते. या सीरिजमध्ये असे अनेक सीन्स आहेत, जे पाहून अंगावर काटा येईलच, पण हात-पाय थरथरायला लागतील.

उत्कृष्ट अभिनय अन् दमदार दिग्दर्शन

करण टॅकर, गौरव तिवारीला जिवंत करतो आणि त्याचा गंभीर दृष्टिकोन कथेला बळकटी देतो. त्याच्यामुळे कल्की कोचलिन, सलोनी बत्रा, दानिश सूद, शुभम चौधरी आणि निमिषा नायर यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. रॉबी ग्रेवाल या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत, ज्यामध्ये भयपट आणि सस्पेन्सचं एक अनोखं मिश्रण आहे. १२ डिसेंबर रोजी प्रदर्शित झालेली ही मालिका ओटीटीवरील भयपट प्रेमींसाठी एका मेजवानीपेक्षा कमी नाही.

## मराठी प्रसिद्ध अभिनेत्री वर्षा उसगावकरांची लाखोंची फसवणूक




मुंबई : मराठी सिनेसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेत्री वर्ष उसगावकर यांची लाखोंची फसवणूक झाल्याची बातमी समोर आली आहे. वर्ष उसगावकरसाह यांच्यासह अनेक अभिनेत्रींची जवळपास ४७ लाखांची फसवणूक झाली आहे.

नेमकं घडलं तरी काय?

अभिनेत्री मृणाली जांभळे यांनी अनेक नाटक आणि सिनेमांमध्ये काम केलंय. त्यांची ओळख आरोपी विनाश काढावं यांच्यासोबत होती. जाधव यांनी सिनेमा निर्माता आणि बांधकाम व्यावसायिक असलायचं सांगितलं होत. यावेळी त्याने डोंबिवली इथल्या प्रकल्पत गुंतवणूक केल्यास अधिक पैसे देईन असं आश्वासन दिल होत. तसाच वर्षभरात मूळ रक्कम परत देईल असा दावाही केला होता. त्या दाव्यानुसार मृणाली, वर्ष उसगावकर आणि आणखी तीन जणांनी मिळून जाधव यांच्याकडे चेक आणि ऑनलाईन व्यवहाराद्वारे ४७ लाखांची गुंतवणूक केली. सुरुवातीला जाधव यांनी काही पैसे परत केले. परंतु त्यानंतर पैसे देणं थांबवलं, वर्ष उसगावकर सगळ्यांनी सतत संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतु जाधव यांनी कोणाला दादा दिली नाही, उलट मोबाईल नंबर, घरचा पत्ता सगळंच बदललं. त्यानंतर वर्ष उसगावकरांसह सगळ्यांनी मिळून डोंबिवलीत जाऊन जाधव यांच्याकडे पैशाची विचारणा केली, त्याला अजब विचारला असता ’ मी पैसे देणार नाही,जे करायचं करा, असं उत्तर मिळालं, तसंच सगळ्यांना जाधव यांनी धमकी सुद्धा दिल्याचं तक्रारीत नमूद करण्यात आलं आहे.
दरम्यान फसवणूक झाळयचं लक्षात येताच २६ फेब्रुवारी रोजी दादरच्या शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात आरोपी जाधवविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलाय, दरम्यान या प्रकरणाचा पोलीस तपस करत असून घटनेची करूसन चौकशी केली जात आहे

## चक ‘कांतारा’ची डुप्लिकेट नव्हे तर पायरेटेड कॉपी?

### पूर्ण चित्रपट पाहणंही ठरेल कठीण



ज्यावर चित्रपटाची मुख्य कल्पना आधारित असल्याचं सांगितलं जातं, त्या चरक उत्सवाबद्दल फारसं काही सांगितलं जात नाही.
उहरीरज्ञ: ऋरळी`ष ऋरळींह ठर्शीेंळशु: या चित्रपटाचा ट्रेलर पाहिल्यावर ‘कांतारा’सारखी एखादी प्रभावी कथा पाहायला मिळेल असं वाटतं. मात्र प्रत्यक्षात चित्रपट पाहताना तो ‘कांतारा’ची डुप्लिकेट नव्हे तर जणू पायरेटेड कॉपीच वाटतो. चित्रपट ना नीट चित्रपट म्हणून उभा राहतो, ना डॉक्युमेंट्री म्हणून, आणि ना थरारक मर्डर मिस्ट्री म्हणून. चित्रपट पाहताना नेमकं दिग्दर्शक काय दाखवू इच्छित होते याबद्दलच संभ्रम निर्माण होतो. चरक उत्सव, नरबळी, अंधश्रद्धा की मर्डर मिस्ट्री नेमकं काय मांडायचं होतं याबाबतच चित्रपट गोंधळलेला वाटतो.कथानक काय?
या चित्रपटाची कथा ‘चरक उत्सवा’भोवती फिरते असा दावा केला जातो. हा उत्सव सुमारे हजार वर्षांपासून बंगाल, बिहार आणि आसामसह काही भागांत साजरा केला जातो. या उत्सव-ाशी संबंधित काही ठिकाणी अंधश्रद्धा आणि बलिदानाच्या गोष्टींचाही उल्लेख केला जातो. चित्रपटात या पार्श्वभूमीवर दोन मुलं अचानक गायब होतात. त्यानंतर संपूर्ण कथा त्या मुलांचं काय झालं हे शोधण्यातच पुढे सरकते. मात्र ज्यावर चित्रपटाची मुख्य कल्पना आधारित असल्याचं सांगितलं जातं, त्या चरक उत्सवाबद्दल फारसं काही सांगितलं जात नाही.

कसा आहे चित्रपट?

एकूणच हा चित्रपट खूपच कमकुवत वाटतो. पूर्ण चित्रपट बसून पाहणंही अनेक प्रेक्षकांसाठी कठीण ठरू शकतं. चित्रपटाचा टोन ठरलेला वाटत नाही. तो ना पूर्णपणे चित्रपटासारखा वाटतो, ना माहितीपट, ना मर्डर मिस्ट्री. अनेक ठिकाणी चित्रपट इतका संथ आणि कंटाळवाणा वाटतो की प्रेक्षकांना थिएटर सोडून जावंसं वाटू शकतं.
‘कांतारा’प्रमाणे एखाद्या परंपरेची प्रभावी कथा पाहायला मिळेल अशी अपेक्षा निर्माण होते, मात्र ती पूर्ण होत नाही. शेवटी दिलेला ट्विस्टही फारसा प्रभाव पाडत नाही.

अभिनय कसा?

अंजली पाटील यांनी ठीकठाक काम केलं आहे. साहिदुर रहमान यांचाही अभिनय साधारण आहे. सुब्रत दत्ता, शशी भूषण आणि नवनीश नील यांनीही आपापली भूमिका व्यवस्थित पार पाडली आहे. मात्र कुणाचाही अभिनय विशेष ठसा उमटवणारा वाटत नाही.

लेखन आणि दिग्दर्शन

संजय हलदर आणि फारुक मलिक यांनी चित्रपटाचं लेखन केलं आहे, तर शिलादित्य मौलिक यांनी दिग्दर्शन केलं आहे. मात्र लेखन आणि दिग्दर्शन दोन्ही ठिकाणी दम जाणवत नाही. ‘द केरळ स्टोरी’शी संबंधित दिग्दर्शक सुदीप्तो सेन यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे, त्यामुळे चित्रपटाबद्दल काही प्रमाणात चर्चा झाली. पण प्रत्यक्षात चित्रपट निराश करतो.

चित्रपट पाहावा की नाही?

एकंदरीत हा चित्रपट प्रेक्षकांना फारसा प्रभावित करत नाही. त्यामुळे हा चित्रपट पाहणं टाळलेलंच बरं.

## बॉलिवूडची अभिनेत्री सोनल चौहान अडकली दुबईत



मुंबई: अमेरिका आणि इस्त्रायलने मिळून इराणवर हल्ला केला असून मोठा युद्धाचा वणवा पेटला आहे. तिन्ही देशांमध्ये घमासान युद्ध सुरु असून हल्ले- प्रतिहल्ल्यांनी जगभरात खळबळ उडाली आहे. आत्तापर्यंत ८ देशांना या युद्धाची झळ पोहोचली असून आशिया खंडामध्ये युद्धाचे काळे ढग निर्माण झाले आहेत. या युद्धाचा फटका दुबईलाही बसला असून अनेक जण दुबईत अडकले आहेत. अशातच बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री सोनल चौहानही दुबईमध्ये अडकली आहे, तिने थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे मदत मागितली आहे.

बॉलिवूड अभिनेत्री सोनल चौहान अडकली दुबईत

बॉलीवूड अभिनेत्री सोनल चौहान दुबईमध्ये अडकली आहे. इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांनंतर दुबईला जाणाऱ्या विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. ज्यामुळे अभिनेत्रीला भारतात परत येणे कठीण झाले आहे. याबाबत तिने इंस्टाग्रामवर पोस्ट शेअर करत देशाचे पंतप्रधान मोदी यांच्याकडे मदत मागितली आहे.
अभिनेत्रीने भारत सरकार आणि पंतप्रधान मोदींकडून मदतीची विनंती केली आहे. इंस्टाग्रामवर पंतप्रधानांना टॅग करत अभिनेत्रीने लिहिले आहे की, आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी, सध्या सुरू असलेल्या संकटात मी दुबईमध्ये अडकली आहे. विमाने रद्द करण्यात आली आहेत आणि भारतात परतण्याचा कोणताही स्पष्ट मार्ग नाही. मला सुरक्षितपणे घरी परतण्यासाठी मदत करण्यासाठी मी सरकारकडून मार्गदर्शन आणि पाठिंबा मागते. सुरक्षित परतीसाठी सरकारकडून कोणत्याही मदत आणि मार्गदर्शनासाठी मी अत्यंत आभारी राहीन.

## करारी पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत पूजा सावंत



मुंबई : मराठी चित्रपटसृष्टीत आघाडीच्या नायिकेला पोलिसांच्या वर्दीत पाहणं हे तसं दुर्मिळच. मात्र आगामी ‘सालबर्डी’ चित्रपटात ही चौकट मोडत पूजा सावंत एका करारी, निर्भीड आणि तडफदार पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत प्रेक्षकांसमोर येत आहे. पी.आय.मनोरमा प्रधान असं तिच्या व्यक्तिरेखेचं नाव आहे. नुकताच 'सालबर्डी' या चित्रपटाचा दमदार टिझर आणि कलाकारांचे प्रभावी पोस्टर दिमाखात प्रदर्शित करण्यात आले असून, त्याने प्रेक्षकांची उत्सुकता कमालीची वाढवली आहे.
या सोहळ्यात पूजाने डॅशिंग एंट्री घेत आपल्या भूमिकेची झलक दाखवली. पोलिस अधिकाऱ्याच्या व्यक्तिरेखेसाठी तिने विशेष मेहनत घेतली असून, पोलिसांची देहबोली,अधिकारपूर्ण संवादशैली आणि शिस्तबद्ध वर्तन यांचा सखोल अभ्यास करत ही भूमिका पूजाने साकारली आहे. वास्तवदर्शीपणा जपण्यासाठी तिने प्रत्यक्ष पोलिस अधिकाऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या कामकाजाचे बारकाईने निरीक्षण केले.
आपल्या भूमिकेबद्दल बोलताना पूजा सांगते, ‘वर्दी अंगावर चढताच एक वेगळाच रुबाब आपोआप येतो. तो वेगळा दाखवावा लागत नाही. वर्दीतच एक ताकद असते. माझी ही भूमिका प्रत्येक स्त्रीला प्रेरणा देणारी ठरेल.’ चित्रपटातील थरारक स्टंट्स आणि दमदार ॲक्शन सीन्स हे 'सालबर्डी' चे खास आकर्षण असणार आहेत. येत्या १७ एप्रिलला हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.महाराष्ट्रातील दुर्गम भागात वसलेल्या ‘सालबर्डी’ गा-वात घडणाऱ्या रहस्यमय, भयावह आणि अस्वस्थ करणाऱ्या घटनांचा थरारक शोध घेणारा हा चित्रपट नेब्यूला फिल्म्सच्या बॅनरखाली साकारण्यात आला आहे. या चित्रपटाची निर्मिती अनिल देवडे पाटील, डॉ. गजानन जाधव आणि राम जाधव यांनी केली असून, दिग्दर्शनाची धुरा रमेश साहेबराव चौधरी यांनी सांभाळली आहे. चित्रपटाचे छायांकन व संकलन सिद्धेश संतोष मोरे यांचे आहे. पटकथा व संवाद रोहित शुक्रे यांचे असून, गुरु ठाकूर आणि मुकुंद भालेराव यांच्या गीतांना पद्मनाभ गायकवाड यांचे संगीत लाभले आहे. पार्श्वसंगीताची जबाबदारी अमर मोहिले यांनी सांभाळली आहे. अजय गोगावले, जावेद अली आणि आनंदी जोशी यांच्या आवाजाने चित्रपटातील गाणी सजली आहेत. नृत्यदिग्दर्शन फुलवा खामकर आणि आशीष पाटील यांनी केले आहे. कार्यकारी निर्माते दीपक कुदळे पाटील असून, वेशभूषा प्रणिता चिंदगे, रंगभूषा श्रीनिवास मेनूगे आणि कलादिग्दर्शन प्रदीप गुरव यांचे आहे.

## अर्थसंकल्प अनेक बाबतीत निराशाजनक वाटतो : धिरज विलासराव देशमुख

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याचा आज अर्थ संकल्प सादर करण्यात आला या अनुषंगाने लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांची प्रतिक्रिया.



आज महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प २०२६ सादर झाला. या अर्थसंकल्पाबाबत सर्वसामान्य जनता, शेतकरी आणि युवकांच्या अपेक्षा मोठ्या होत्या; मात्र सादर झालेला अर्थसंकल्प अनेक बाबतीत निराशाजनक वाटतो. सरकारने मोठ्या घोषणा केल्या असल्या तरी प्रत्यक्षात जनतेला दिलासा देणाऱ्या ठोस उपाययोजना फारशा दिसून येत नाही.

राज्यातील शेतकरी आजही कर्जबाजारीपण, उत्पादन खर्चातील वाढ आणि बाजारभावातील अनिश्चितता यामुळे अडचणीत आहेत. अशा परिस्थितीत जाहीर करण्यात आलेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्ज माफी योजना ही योजना शेतकऱ्यांच्या सर्वांगीण अपेक्षा पूर्ण करणारी वाटत नाही. अनेक शेतकरी या योजनेच्या कक्षेबाहेर राहण्याची शक्यता असल्याने ती प्रभावी ठरणार का, याबाबत प्रश्न निर्माण होत आहेत.

तसेच लाडकी बहीण योजने संदर्भात वाढीव निधी सरकार देईल अशी अपेक्षा होती.महागाई, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य आणि ग्रामीण विकास यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये जनतेला दिलासा देणारे ठोस निर्णय अपेक्षित होते. मात्र अर्थसंकल्पात या प्रश्नांवर दीर्घकालीन व प्रभावी उपाययोजना दिसून येत नाहीत. घोषणांचा पाऊस असला तरी त्यासाठी आवश्यक असलेली स्पष्ट आर्थिक तरतूद आणि अंमलबजावणीची ठोस दिशा दिसत नाही.

म्हणूनच हा अर्थसंकल्प राज्याच्या सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणारा निश्चितच नाही. सरकारने केवळ घोषणा न करता प्रत्यक्षात जनतेला दिलासा देणारे निर्णय घेऊन त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे ही काळाची गरज बनली आहे.

## लातूर व रेणापूर पंचायत समिती काँग्रेस गटनेते व पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते निवड



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर व रेणापूर पंचायत समितीतील काँग्रेस पक्षाच्या गटनेते व पदाधिकाऱ्यांची निवड नुकतीच सर्वानुमते करण्यात आली. या निवडीमध्ये पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक पार पडली असून दोन्ही पंचायत समित्यांमध्ये पदाधिकाऱ्यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली.

लातूर पंचायत समितीच्या गटनेतेपदी गवळी गुरुनाथ निवृत्ती यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. उपगटनेतेपदी पाटील सत्यनारायण व्यंकटराव यांची निवड करण्यात आली आहे. तसेच मुख्य प्रतोद म्हणून देशमुख अक्षय अप्पासाहेब, तर प्रतोदपदी देडे अमोल दासराव यांची निवड करण्यात आली.

याचप्रमाणे रेणापूर पंचायत समितीच्या गटनेतेपदी तात्याराम सखाराम वाघमारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. उपगटनेतेपदी गोटके बालाजी पंडीत, तर मुख्य प्रतोद म्हणून जाधव उद्धव देविदासराव यांची निवड जाहीर करण्यात आली.

ही निवड प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ साहेब, माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब, माजी मंत्री अमित विलासराव देशमुख साहेब तसेच लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख साहेब यांच्या सूचनेनुसार करण्यात आली.

लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंखे तसेच लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष किरण जाधव यांच्या निरीक्षणाखाली व लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख,लातूर तालूका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष उमेश बेद्रे,रेणापुर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रमोद कापसे यांच्या उपस्थितीत सदरील निवड बैठक पार पडली. बैठकीदरम्यान उपस्थित पदाधिकाऱ्यांनी नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत पुढील काळात पक्ष संघटना अधिक मजबूत करून नागरिकांच्या न्याय हक्कासाठी कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांनी पक्ष नेतृत्वाने दिलेल्या जबाबदारीचे प्रामाणिकपणे पालन करून पंचायत समितीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# महिला दिनी HPV लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

## गर्भाशय मुखाच्या कर्करोग प्रतिबंधासाठी मुलींना मोफत लस

**धाराशिव/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार २८ फेब्रुवारी २०२६ रोजी पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते HPV (Human Papilloma Virus) लसीकरण मोहिमेचा देशव्यापी शुभारंभ करण्यात आला.या अनुषंगाने महाराष्ट्रातही दि.८ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात येणार आहे.हा कार्यक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री.प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-योडर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येणार आहे.भारत सरकार व महाराष्ट्र राज्य आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गर्भाशय मुखाच्या कर्करोगाला (Cervical Cancer) प्रतिबंध करण्यासाठी ही HPV लसीकरण मोहीम सुरू करण्यात आली आहे.

महिलांमध्ये आढळणाऱ्या गंभीर कर्करोगांपैकी गर्भाशय मुखाचा कर्करोग हा एक प्रमुख आजार असून त्यावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून क्ष्ज्ञत लसीकरण प्रभावी ठरते.या अनुषंगाने धाराशिव जिल्ह्यात ही मोहीम प्रारंभी तीन महिन्यांच्या कालावधीसाठी राबविण्यात येणार असून त्यानंतर क्ष्ज्ञत लसीकरणाचा समावेश नियमित लसीकरण कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

या मोहिमेअंतर्गत वय वर्षे १४ ते १५ या वयोगटातील मुलींना क्ष्ज्ञत लस मोफत देण्यात येणार आहे. GARDASIL-4 (Quadrivalent) ही लस पूर्णपणे सुरक्षित असून जागतिक आरोग्य संघटना (WHO) यांनी प्रमाणित केलेली आहे.या लसीचा ०.५ मिली इतका सिंगल डोस स्नायूमध्ये (IM) डाव्या हाताच्या वरच्या भागात देण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये ही लस उपलब्ध करून देण्यात येणार आहे.यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र,ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय,जिल्हा रुग्णालय तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांचा समावेश असून या सर्व ठिकाणी लाभार्थींना लस पूर्णपणे मोफत दिली जाणार आहे.

लाभार्थी व त्यांच्या पालकांनी लसीकरणासाठी येताना आधार कार्ड किंवा आभा आयडी कार्ड तसेच मोबाईल नंबर सोबत आणणे आवश्यक आहे.तसेच मुलींना लसीकरणासाठी आणताना पालकांनी त्यांना नाश्ता किंवा जेवण करून आणावे,असे आवाहन करण्यात आले आहे.



लसीकरणा संदर्भातील कोणत्याही शंका किंवा माहितीकरिता १०४ हा हेल्पलाईन क्रमांक निश्रि्चत करण्यात आलेला आहे.तथापि, काही परिस्थितीत HPV लस घेऊ नये, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

मध्यम किंवा तीव्र आजार असलेल्या मुलींनी पूर्णपणे बरे होईपर्यंत HPV लस घेऊ नये.मागील लसीकरणामुळे एलर्जी रिऍक्शन आलेली असेल किंवा यीस्ट (Yeast) ची ऍलर्जी असल्यास लस घेऊ नये. गर्भावस्था असल्यास क्ष्ज्ञत लस घेऊ नये. अपेक्षित वयोगटाबाहेरील मुलींना ही लस देण्यात येणार नाही. तसेच ज्यांना यापूर्वी HPV लस देण्यात आलेली आहे,त्यांनी पुन्हा ही लस घेऊ नये.

गर्भाशय मुखाचा कर्करोगमुक्त भविष्यासाठी आपल्या मुलींचे वेळेवर लसीकरण करणे ही काळाची गरज आहे. पालकांनी कोणत्याही अफवांवर विश्र्वास न ठेवता या मोहिमेत सक्रियपणे सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ.धनंजय चाकूरकर, जिल्हा शल्यचिकित्सक,धाराशिव यांनी केले आहे.

## अर्थसंकल्प महाराष्ट्राला नवी दिशा देणारा : सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील

**लातूर/प्रतिनिधी :** अर्थसंकल्प हा महाराष्ट्राला नवी दिशा देणार असून, या अर्थसंकल्पातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या सर्व घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी सुद्धा करण्याचा निर्णय केला असून या निर्णयामुळे अनेकांना दिलासा मिळणार आहे. २०४७ पर्यंत भारत निश्चित एक विकसित राष्ट्र म्हणून उदयास येईल तेव्हा महाराष्ट्राची भूमिका ही महत्त्वाची असणार आहे . हीच या अर्थसंकल्पातून अधोरेखित झाले आहे.



मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर्षीचा अर्थ संकल्प हा आमचे नेते स्वर्गीय अजित पवार दादा यांना समर्पित केला ,त्याचबरोबर दादांचे भव्य स्मारक व अजितदादांच्या नावाच्या अनेक योजना त्यांनी अर्थसंकल्पात घोषित केल्या त्याबद्दल मी या राज्याचा मंत्री म्हणून त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

## राज्यात ७ मोठ्या वीज पारेषण प्रकल्पांना गती

### आरईसीपीडीसीएल व पीएफसीसीएल यांची बिड प्रोसेस कोऑर्डिनेटर म्हणून नियुक्ती

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यातील वीज पारेषण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी एकूण सात महत्त्वाच्या उच्चदाब (EHV) प्रकल्पांना राज्य शासनाने मान्यता दिली असून या प्रकल्पांसाठी बिड प्रोसेस कोऑर्डिनेटर (BPC) म्हणून REC Power Development Consultancy Ltd. (RECPDCL) आणि PFC Consulting Ltd. (PFCCL) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या संदर्भातील शासन निर्णय दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी जारी करण्यात आला.

या प्रकल्पांमध्ये ४०० केव्ही, ७६५ केव्ही आणि २२० केव्ही क्षमतेच्या नवीन जीआयएस व एआयएस उपकेंद्रांची उभारणी तसेच विविध उच्चदाब वहिन्यांचे (ङखङज) काम समाविष्ट आहे. राज्यातील वाढत्या औद्योगिक, कृषी आणि नागरी वीज मागणीचा विचार करून ही कामे हाती घेण्यात येत आहेत.

प्रमुख प्रकल्पांचा आढावा :

१) सोलापूर / परांडा ४०० केव्ही जीआयएस स्विचिंग स्टेशन (जि. धाराशिव) १२५ एमव्हीएआर बस रिऍक्टरसह स्विचिंग स्टेशन उभारण्यात येणार असून सुमारे २५५ कि.मी. लांबीची ४०० केव्ही दुहेरी वहिनी पुणे पश्र्िचम (प्रस्तावित ७६५ केव्ही जीआयएस) पर्यंत जोडण्यात येणार आहे.

२) परळी ७६५ केव्ही एआयएस उपकेंद्र (जि. बीड) ३१५०० एमव्हीए, ७६५/४०० केव्ही आयसीटीसह अत्याधुनिक उपकेंद्र उभारण्यात येणार असून वरोरा-परळी व इतर उच्चदाब लाईनचे एलआयएलओ प्रस्तावित आहे.

३) यवतमाळ (बाभुळगाव) ४०० केव्ही एआयएस उपकेंद्र २५०० एमव्हीए क्षमतेचे ४००/२२० केव्ही आयसीटी, तसेच हिंगोली व इतर भागांशी नवीन वहिनीद्वारे जोडणी करण्यात येणार आहे.

४) केसरडी (जि. सातारा) २२० केव्ही जीआयएस उपकेंद्र २१०० एमव्हीए २२०/१३२ केव्ही आयसीटीसह ३३ केव्ही जीआयएस बेची उभारणी करण्यात येणार आहे.

५) पुणे पश्र्िचम ७६५ केव्ही जीआयएस उपकेंद्र (जि. पुणे) ३१५०० एमव्हीए क्षमतेचे आयसीटी आणि डेटा सेंटर ग्राहकांसाठी स्वतंत्र ४०० केव्ही बेची तरतूद करण्यात येणार आहे.

६) हिंगोली पश्र्िचम ४०० केव्ही एआयएस उपकेंद्र ३५०० एमव्हीए आयसीटीसह जालना व परभणी भागाशी नवीन जोडणी प्रस्तावित आहे.

७) इगतपुरी/मुरबाड ४०० केव्ही जीआयएस स्विचिंग स्टेशन (जि. ठाणे) उद्योग आणि पंप स्टोरेज प्रकल्पांना जोडणी देण्यासाठी स्वतंत्र बेची तरतूद करण्यात आली आहे.

या सर्व प्रकल्पांमुळे राज्यातील पारेषण जाळे अधिक मजबूत होणार असून भविष्यातील वीज मागणी, हरित ऊर्जेचे समाकलन (Integration) आणि औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेद्वारे खाजगी सहभागातून ही कामे पूर्ण करण्यात येणार आहेत.

# बांबू सामुदायिक विकास केंद्राची स्थापना होणार पेठ तालुक्यातील बांबू उद्योगाला मिळणार नवी उभारी

- मुक्त विद्यापीठाचा रोजगाराभिमुख उपक्रम
- दत्तकग्राम घनशेतला बांबू कारागिरांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

**नाशिक/प्रतिनिधी:** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि विद्यापीठाने दत्तक घेतलेल्या पेठ तालुक्यातील घनशेत गावाची ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने बांबू कारागिरांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. दुर्गम आदिवासी भागातील बांबू कारागिरांना तांत्रिक कौशल्य, उपजीविकेचे साधन व्यासपीठ आणि जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या दिशेने एक पाउल म्हणून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यास पेठ, दिंडोरी, सुरगणा आणि त्र्यंबकेश्वर या तालुक्यांमधून ७० बांबू कारागीर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे होते.

व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन उपस्थित होते. नाशिक जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक श्री. ए. आर. साखरे, पेठ वनविभागाचे प्रादेशिक अधिकारी श्री. अमित साळवे, सक्सेस ग्लोबल फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. नितीन सोनवणे, घनशेतच्या सरपंच श्रीमती शांता चौधरी, गावंधचे सरपंच श्री. धनराज ठाकरे, कुळवंडीच्या सरपंच श्रीमती सुनंदा सहारे आणि आमलोनच्या सरपंच श्रीमती वनिता भोये यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना मा. कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे म्हणाले की बांबू कारागिरांच्या हाताला काम आणि त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी मुक्त विद्यापीठ कटिबद्ध आहे. कौशल्यावर आधारित शिक्षणातूनच ग्रामीण विकास शक्य असून ज्ञानगंगा घरोघरी या ब्रीदवाक्याप्रमाणे 'रोजगार आपल्या दारी' पोहोचवण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. येथे जिल्हा उद्योग केंद्राच्या सहकार्याने स्थानिकांना हक्काचा रोजगार मिळवून देवून बांबू उद्योगाला मोठी चालना दिली जाणार असल्याचेही ते म्हणाले. प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी पारंपरिक कलेला आधुनिकतेची जोड मिळाल्यास आदिवासी युवकांचे जीवनमान उंचावेल असा विश्वास व्यक्त केला. जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक श्री. ए. आर. साखरे यांनी बांबू व्यवसायासाठी उपलब्ध असणाऱ्या शासकीय योजना, कर्ज सुविधा आणि सबसिडी याबद्दल सविस्तर माहिती दिली. वनविभागाचे प्रादेशिक अधिकारी श्री. अमित साळवे यांनी बांबू लागवड, वनविभागाचे नियम आणि कच्च्या मालाच्या उपलब्धतेवर प्रकाश टाकला, तर सक्सेस ग्लोबल फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. नितीन सोनवणे यांनी बांबू उत्पादनांचे ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि जागतिक बाजारपेठेतील मागणी यावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक विद्यापिठाच्या ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखेचे संचालक प्रा. कैलास मोरे यांनी केले. त्यात त्यांनी या उपक्रमांतर्गत घनशेत ग्रामपंचायतीने सामूहिक वनहक्क दाव्यातील दोन



एकर जागा बांबू सामुदायिक विकास केंद्रासाठी विद्यापीठाला उपलब्ध करून दिली असून त्यावर विविध प्रजातींच्या बांबूची लागवड केली जाणार असल्याचे सांगितले.

यानिमित्ताने पारंपरिक टोपल्या आणि सुपांच्या पलीकडे जाऊन कारागिरांनी बनवलेल्या बांबूच्या शोभेच्या वस्तू आणि फर्निचरचे प्रदर्शनही यावेळी भरवण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. माधव टोपले यांनी केले तर आभार डॉ. दीपक सोनवणे यांनी मानले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत अधिकारी श्री. नंदू गायकवाड, श्री. विनायक महाले, श्री. रवींद्र चौधरी, श्री. कैलास चौधरी, श्री. जनार्दन भोये तसेच श्री. गोकुळ टोंगारे आणि गणेश उमाळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूल, भविष्यात एज्युकेशनल हब बनेल - संतोष मुक्ता

*लातूर/प्रतिनिधी : विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूल येथे शनिवार, २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त सायन्स एक्झिबिशन उत्साहात संपन्न झाले. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा आणि नवसंशोधनाला चालना मिळावी या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.*

*कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी संतोष मुक्ता (लातूर लोकसभा प्रभारी, भाजप) हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिवानंद पाटील व भागीरथी शिवानंद पाटील (जिल्हा परिषद सदस्य) उपस्थित होते. तसेच शाळेचे प्राचार्य व संस्थेचे सचिव बसवेश्वर धाराशिवे, प्राचार्य किशोर जेवे, अमोल कुंभार, महिशंकर धाराशिवे, विकास मुगळे, विद्या कापसे, गोपाल दंडीमे, प्रकाश झुंजारे व जनार्धन कास्ते (माजी पंचायत समिती सदस्य), ऋतिक धाराशिवे, विलास सगरे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.*




*कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मेघा मुळे यांनी केले. त्यांनी 'रामन इफेक्ट' या वैज्ञानिक शोधावर प्रकाश टाकत त्याचे महत्त्व स्पष्ट केले. प्राचार्य किशोर जेवे यांनी आपल्या भाषणात शाळेची प्रगती, विविध शैक्षणिक उपक्रम व विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. तसेच शाळेने स्थापनेच्या दुसऱ्याच वर्षी 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानांतर्गत केंद्रात प्रथम क्रमांक मिळवल्याचा उल्लेख केला.*

*सायन्स एक्झिबिशनमध्ये एकूण १३५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून विविध विज्ञानाधारित प्रकल्प सादर केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व सादरीकरण कौशल्याचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.*

*उद्घाटक संतोष मुक्ता यांनी आपल्या मनोगतात भविष्यात विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूल हे शैक्षणिक क्षेत्रात आदर्श ठरेल व एक सक्षम एज्युकेशनल हब बनेल, असा विश्वास व्यक्त केला. त्यांनी शाळेच्या सांस्कृतिक, क्रीडा व शैक्षणिक जडणघडणीबद्दल विशेष प्रशंसा केली.*

*कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सायली देशमुख यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. शितल डोंगरे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.*


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

**अधिसूचना**

**(भूसंपादन अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) मधील कलम ११ अन्वये)**

**क्र. २०२२/भूसं/मा.प्र/कार्या-१/कावी-९२०**
**उपजिल्हाधिकारी भूसंपादन मांजरा प्रकल्प धाराशिव यांचे कार्यालय,**
**दिनांकः-३०/१०/२०२५**

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३

ज्याअर्थी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग शासन अधिसुचना क्र. MIS-11/2014/CR-77(PART-2)/A-2 DATED ११/०९/२०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी एखादया जिल्हयातील १०,००० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधित अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या धाराशिव जिल्हाच्या जिल्हाधिका-यांस यासोबत जोडलेल्या अनुसूची मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमिनीच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त जमिन असा करण्यात आला आहे) संपादनाची कार्यवाही ही सार्वजनिक प्रयोजनासाठी (या यापुढे ज्याचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते ज्याच्या स्वरुपाचे विवरण या सोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणूनच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (०१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे सूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, या यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (सदर प्रकल्पात कोणत्याही व्यक्तीचे विस्थापन होणार नाही).

ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (०१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे. (सदर प्रकल्पात पुनर्वसन व पुनर्वसाहत करण्याची आवश्यकता नाही.)

त्याअर्थी, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यव-हार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकार-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल. परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्तर उल्लंघन केल्यास त्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-याकडून भरपाई दिली जाणार नाही. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (०५) नुसार जिल्हाधिकारी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क नियम महाराष्ट्र २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (०३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमीअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

**अनुसूची एक**
**जमिनीचे वर्णन**

**गाव : भोत्रा तालुका : परंडा जिल्हा : धाराशिव**

| अ.क्र | भुमान किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र हे आर मध्ये |
|---|---|---|
| १ | १७ | ०.३५ |
| २ | १६ | ०.३४ |
| ३ | १८ | ०.२३ |
| ४ | २२ | ०.१९ |
| ५ | २३ | ०.९१ |
| ६ | २४ | ०.३३ |
| ७ | २५ | ०.१६ |
| ८ | २६ | ०.२१ |
| ९ | २७ | ०.२२ |
| १० | ३० | ०.१५ |
| ११ | २९ | ०.२३ |
| १२ | २८ | ०.१४ |
| १३ | ३१ | ०.२० |
| **एकूण** | | **३.६६** |

(अरूणा गायकवाड) उपजिल्हाधिकारी,
भूसंपादन मांजरा प्रकल्प, धाराशिव

# आखाती तणावाच्या पार्श्वभूमीवर इंधन तुटवड्याची अफवा

# धाराशिवमध्ये पेट्रोल-डिझेल साठा मुबलक,प्रशासनाचे आवाहन

धाराशिव दि.५ मार्च (जिमाका)सध्या आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या तणावपूर्ण पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यात इंधन तुटवडा निर्माण झाल्याची अफवा काही ठिकाणी पसरत असल्याचे निदर्शनास आले आहे.या अफवेमुळे जिल्ह्यातील सर्वसाधारणपणे सर्वच पेट्रोल पंपांवर वाहनधारकांकडून अतिरिक्त स्वरूपात इंधन साठवण्यासाठी गर्दी होत असल्याचे प्रशासनाच्या लक्षात आले आहे.

यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की,जिल्ह्यामध्ये पेट्रोल व डिझेलचा साठा सध्या पर्याप्त प्रमाणात उपलब्ध असून इंधन पुरवठा पूर्णपणे सुरळीत सुरू आहे. जिल्ह्यात कार्यरत सर्व पेट्रोल पंपांवर नियमित पुरवठा होत असून कोणत्याही प्रकारचा तुटवडा निर्माण झालेला नाही.सर्व पेट्रोल पंप कंपन्यांच्या विक्री अधिकारी व प्रतिनिधींना इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनामार्फत आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवून घाबरून जाण्याची गरज नसून पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी करणे टाळावे,असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिकृत माहितीसाठी नागरिकांनी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा. चुकीची माहिती पसरविणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येईल,याची नोंद घ्यावी,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.तरी सर्व नागरिकांनी संयम बाळगून प्रशासनास सहकार्य करावे,असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# थोरामोठ्यांच्या आशीर्वादाने उमरगा पंचायत समितीवर झेंडा!

# आकांक्षा ज्ञानराज चौगुले यांची सभापतीपदी बिनविरोध निवड

**उमरगा (रामेश्वर डोंगरे)–** तालुक्यातील राजकारणात मोठी घडामोड घडली असून शिवसेना युवा नेत्या आकांक्षा ज्ञानराज चौगुले यांची उमरगा पंचायत समितीच्या सभापतीपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे उमरगा तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सभापतीपदी निवड झाल्यानंतर आकांक्षा चौगुले यांनी सर्वप्रथम घरातील ज्येष्ठांचे आणि थोरामोठ्यांचे आशीर्वाद घेतले. त्यांच्या या विजयामागे कुटुंबातील वडीलधाऱ्यांचे मार्गदर्शन, कार्यकर्त्यांचे अथक परिश्रम आणि जनतेचा विश्वास असल्याची भावना व्यक्त होत आहे. फोटोमध्ये दिसत असलेले ज्येष्ठांच्या आशीर्वादाचे क्षण हेच त्यांच्या यशाचे खरे बळ असल्याची चर्चा उमरगा तालुक्यात रंगली आहे.

उमरगा पंचायत समितीच्या राजकारणात तरुण नेतृत्वाला मिळालेली ही मोठी संधी मानली जात आहे. आकांक्षा चौगुले यांनीही थोरामोठ्यांच्या आशीर्वादाने आणि जनतेच्या विश्वासावर उमरगा तालुक्याच्या विकासासाठी प्रामाणिकपणे काम करणार अशी भावना व्यक्त केली.

त्यांच्या निवडीमुळे शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून अनेकांनी त्यांचे अभिनंदन करत फुलांच्या वर्षावात स्वागत केले. थोरामोठ्यांचे आशीर्वाद, कार्यकर्त्यांची ताकद आणि जनतेचा विश्वास याच बळावर उमरगा तालुक्यात नव्या नेतृत्वाची दमदार सुरुवात झाल्याची चर्चा सध्या तालुकाभर रंगली आहे.





# धाराशिव पंचायत समितीत महिला शक्तीचा जलवा!

# गोकर्णा कदम सभापतीपदी; प्रमोद पाटील उपसभापतीपदी निश्चित

**धाराशिव (रामेश्वर डोंगरे)**–पंचायत समितीच्या राजकारणात मोठी राजकीय घडामोड घडली असून तालुक्याच्या राजकारणात महिला नेतृत्वाचा दबदबा पुन्हा एकदा दिसून आला आहे. इर्ला गणातून निवडून आलेल्या गोकर्णा गोपाळ कदम यांची पंचायत समितीच्या सभापतीपदी निवड निश्चित झाल्याचे तर वडगाव सिद्धेश्वर गणाचे सदस्य प्रमोद पाटील यांची उपसभापतीपदी निवड जवळपास निश्चित झाल्याची माहिती राजकीय सूत्रांकडून समोर आली आहे. या निवडीमुळे पंचायत समितीच्या सत्तेवर महायुतीची पकड अधिक मजबूत झाली असून तालुक्याच्या राजकारणात मोठी चर्चा रंगली आहे. धाराशिव पंचायत समितीच्या जवळपास ६० वर्षांच्या इतिहासात गोकर्णा कदम या पाचव्या महिला सभापती ठरणार आहेत.

त्यामुळे महिला नेतृत्वाला मिळालेली ही मोठी संधी मानली जात आहे. आता पंचायत समितीच्या माध्यमातून तालुक्यातील विकासकामांना गती, ग्रामीण भागातील समस्या सोडवणे आणि विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी कशी होते याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

**अनुसूची दोन**
**सार्वजनिक प्रयोजन स्वरुपात विवरण.**

**प्रकल्पाचे नांव :-** कार्यकारी अभियंता सिना कोळेगाव प्रकल्प विभाग परंडा

**प्रकल्पाचे वर्णन:-** सिना कोळेगाव प्रकल्प, मुगाव शाखा कालवा वरील वितरीका क्र. ०२ लघु वितरीका क्र. ०४ मौ. भोत्रा ता. परंडा येथील ३.६६ हे आर संपादीत करणे.

समाजाला मिळणारे लाभः परंडा तालुक्यातील अवर्षण क्षेत्रात मुगाव शाखा कालवा वरील वित्तरीका क्र. ०२ लघु वितरीका क्र. ०४ मौ.भोत्रा ता.परंडा येथील ३.६६ हे आर इतके क्षेत्र सिना कोळेगाव धरणाच्या कालवा क्षेत्रामध्ये येत असुन सदर संपादित क्षेत्राचा अतिरिक्त रक्कम संबंधित शेतक-यांनी मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

**अनुसूची तीन**
**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.**

सदरच्या भूसंपादन प्रक्रीयेमुळे सदरील गावातील कोणतीही व्यक्ती/कुटुंब सद्यस्थितीमध्ये विस्थापीत होत नाहीत.

**अनुसूची चार**
**(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)**

सदरच्या प्रकरणी भूसंपादन अधिनियम १८९४ मधील तरतुदींनुसार सिना कोळेगाव प्रकल्प, मुगाव शाखा कालवा वरील वितरीका क्र. ०२ लघु वितरीका क्र. ०४ मौ. भोत्रा ता. परंडा जि. धाराशिव भुसंपादन व पुर्नस्थापना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा वापर दर्शकतेचाच हक्क अधिनियम २०१३ मधील कलम ६ (२) मधील Provided that in respect of irriagation Projects where the Process of Environment Impact Assessment is required under the Provisions of any other law for the time being in force the provisions of any other law for the time being in force the provisions of this act relating to social impact assess men shall not apply हि तरतुद लागु होते यामुळे या प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राच्या संपादनाकरीता सामाजिक परिणाम निर्धारण अहवालाची आवश्यकता नाही.

**अनुसूची पाच..**
**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

अ - प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम-लागू नाही

ब- प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता लागू नाही

थ- ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशील लागू नाही.

सदर प्रकल्पासाठी होणाऱ्या भूसंपादनामुळे कुठल्याही व्यक्तीचे पुनर्वसन करण्याची आवश्कता नाही, त्यामुळे अधिनियम ४३ अन्वये प्रशासकाची नियुक्ती केलेली नाही. टिप :- १)

२) उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी भूसंपादन मांजरा प्रकल्प, धाराशिव यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायदयाचे कलम ११ चे उप कलम ०१ खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रार्रभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत उपजिल्हाधिकारी भूसंपादन, मांजरा प्रकल्प धाराशिव यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

दिनांकः ३० /१०/२०२५
ठिकाणः धाराशिव

जा.क्र/जिमाका/एके/जाहि/१५६

(अरूणा गायकवाड) उपजिल्हाधिकारी,
भूसंपादन मांजरा प्रकल्प, धाराशिव

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649